# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०४/२००६.** **दिनांक २४.०४.२००६**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे सोमवार दिनांक २४ एप्रिल, २००६ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-५०४९-२००६, दिनांक १७ एप्रिल,२००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक २४ एप्रिल, २००६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील |
| ०२. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग | ०४. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. |
| ०५. | मा.श्री प्रकाश रामदास काळे | ०६. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव |
| ०७. | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे | ०८. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १०. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते. |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, विश्वस्त, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक,मा.डॉ.पी.एल. तिवारी, यांचे आलेले दूरध्वनी निरोप तसेच मा.श्री. समि खतिब, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.श्री. कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय, यांचे फॅक्स व पत्राची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.१.०४.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२५९.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१.०४.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**०१) निर्णय क्र.२२०**

"सदरहू विषय स्थगीत ठेवण्यात यावा. दरम्यान संस्थानचे इमारतीत उपलब्ध असलेल्या सर्व गाळयांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरले."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे-**

"सदरहू विषय स्थगीत ठेवण्यात यावा. दरम्यान संस्थानचे इमारतीत उपलब्ध असलेले सर्व गाळे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, लिलावाने ११ महिन्यांचे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर चालविण्यास देण्यात यावेत, असे ठरले.

(कार्यवाही-विधी अधिकारी/धर्मशाळा प्रमुख/अधिक्षक,भक्तनिवासस्थान/अधिक्षक,चौकशी व निवासस्थान/बांधकाम विभाग प्रमुख)

**०२) निर्णय क्र.२२९ शेवटचा परिच्छेद**

"वरीलपैकी मे. चिमको बायोमेडीकल, मुंबई यांचे दर हे कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे आहे. तर कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचे दर हे भारतीय म्हणजे स्वतःचे आहे. डॉ. वाघ यांचे म्हणणेनुसार मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांच्या सिझर्स खरेदी केल्या तरी चालतील. तेंव्हा मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचेकडून वरील सिझर्स खरेदी करता येतील. याकामी रु. ७४,२२५/- इतका खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. "

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे-**

" वरीलपैकी मे. चिमको बायोमेडीकल, मुंबई यांचे दर हे कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे आहे. तर कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचे दर हे भारतीय म्हणजे स्वतःचे आहे. डॉ. वाघ यांचे म्हणणेनुसार मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांच्या सिझर्स खरेदी केल्या तरी चालतील. तेंव्हा मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचेकडून वरील सिझर्स खरेदी करता येतील. याकामी रु. ७४,२२५/- अधिक १२.५० % Vat इतका खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. "

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/वै.अधिक्षीका रुग्णालय)

**विषय नं.०२.** **गुंतवणूकीबाबत**

**निर्णय क्र.२६०.** माहे एप्रिल-मे, २००६ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.नं. | बँकेचे नाव | मुदतपूर्तीचा दिनांक | मुदतीअंती उपलब्ध रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | पंजाब नॅशनल बँक, नासिक | २९.०४.२००६ | १,२५,८०,९४२.०० |
| ०२. | बँक ऑफ बरोडा, नासिक | ११.०५.२००६ | १,८१,२४,७६७.०० |
| ०३. | युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १२.०५.२००६ | ३,०२,०७,९४५.०० |
| ०५. | माहे एप्रिल-मे,२००६ अखेर दैनंदिन खर्चवजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | २,५०,००,०००.०० |
| | | एकूण रक्कम रुपये | ८,५९,१३,६५४.०० |

**अ** ) संभाव्य खर्च खालीलप्रमाणे :

| **तपशील** | **रक्कम** |
|---|---|
| १) शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२५ मधील जमीन खरेदी | ५३६,००,०००.०० |
| २) कोपरगांव येथील रस्त्याच्या कामासाठी अपेक्षीत खर्च | १,१२,००,०००.०० |
| ३) शिर्डी येथील श्री बच्छानी यांचे भूसंपादन कामी खर्च | ५,८०,००,०००.०० |
| एकूण :- | १२,२८,००,०००.०० |

वरीलप्रमाणे एकूण संभाव्य खर्च रु.**१२.२८** कोटी एवढा आहे. सदरचा खर्च हा ३० एप्रिल, २००६ पूर्वी करावयाचा असल्यास उपरोक्त गुंतवणूकांचे मुदतपूर्तीपूर्वी रोखीकरण करावे लागेल. तसेच आवश्यकता भासल्यास आणखी काही गुंतवणूकांचे मुदतपूर्तीपुर्वी रोखीकरण करावे लागेल. त्यास मान्यता असावी ही विनंती.

**ब** ) आंध्र बँक, शिर्डी यांचेमार्फत संस्थानने भक्तांसाठी नित्य प्रसाद अन्नदान ही योजना राबविलेली आहे. या योजनेंतर्गत भक्तांकडून चेक/डीडी स्वरुपात आलेली देणगी बँकेकडून स्वीकारली जाते व अशा रकमेकरीता एक स्वतंत्र खाते उघडले असून त्याचा क्रमांक १११ असा आहे. या खात्यातच भक्तांकडून नित्य प्रसाद अन्नदानासाठी आलेल्या चेक / डी डीचा भरणा केला जातो.

सदरच्या खात्यात आज अखेर रक्कम रु.१७.१० लाख एवढी शिल्लक आहे. या योजनेतील अटी/नियमानुसार या खात्यातील शिल्लक रक्कम ही त्याच बँककडे ( आंध्र बँक, शिर्डी ) मुदतठेवीत गुंतविणे बंधनकारक असल्याने, उपरोक्त प्रमाणे शिल्लक असलेल्या रु.१७.१० मधून रक्कम रु.१७ लाख त्यांचेकडेच ३ वर्षांकरीता ७.२५ % या व्याजदराने गुंतविण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी वरील **अ** व **ब** प्रमाणे मान्यता मिळून, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त **"अ"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यकता भासेल तशा प्रथम अल्प मुदतीच्या व त्यानंतर अलिकडील काळात, ज्यांचे व्याजदर कमी आहेत व कमी आर्थिक नुकसान होईल अशा दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकांचे रोखीकरण करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच **"ब"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे १७ लाख रक्कमेची नित्य प्रसाद अन्नदान योजनेअंतर्गत ३ वर्षांकरिता ७.२५% व्याजदराने गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०३. नविन प्रसादालय इमारत बांधकाम निविदांबाबत.**

**निर्णय क्र.२६१.** शेती महामंडळाकडुन ताब्यात घेतलेल्या मौजे निमगाव को-हाळे गट नं.८०,८५ मधिल जमिनीवर प्रसादालयासाठी सर्व सोयीं सुविधांयुक्त अशी प्रशस्त नविन इमारत बांधकामास व्यवस्थापन समितीचे दि.०३/०५/२००५ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.१८२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यान्नुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन सदर प्रकल्पासाठी ठेकेदारांचे पूर्व पात्रता (Pre Qualification) अर्ज मागविण्यात आले. त्यासाठी २१ ठेकेदारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी आर्कीटेक्ट शक्ती परमार, मुंबई यांचे शिफारशीन्नुसार खालील पात्र ०९ ठेकेदारांना निविदा घेणेकामी निविदा सूचनांचे (Notice inviting Tender) पत्र पाठविण्यात यावे असे दि. १८/१२/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७३८ अन्वये ठरले होते. त्यान्नुसार खालील ठेकेदारांना पत्र पाठविणेत आले.

०१. युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि, मुंबई
०२. आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे
०३. बी.जी. शिर्के, कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.पुणे
०४. बी.ई. बिलीमोरीया ॲण्ड कं. लि., पुणे

०५.	नॅशनल प्रोजेक्टस् कंन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन लि., परळी वैजनाथ (बीड)
०६.	जेएमसी प्रोजेक्टस् (इंडिया ) लि., अहमदाबाद
०७.	शापूरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., मुंबई
०८.	आर.एल.दलाल ॲण्ड कं. प्रा.लि., मुंबई
०९.	गॅमन इंडिया लि., मुंबई

निविदा सादर करण्याची अंतिम मूदत दिनांक २०/०२/२००६ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील ठेकेदारांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक क्रं. दिनांक | पाकीट संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि, मुंबई | ४५३०/ दि.२०/०२/०६ | ०१ |
| ०२ | बी.जी. शिर्के, कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.पुणे | ४५३१/ दि.२०/०२/०६ | ०१ |
| ०३ | आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे | ४५३२/ दि. २०/०२/०६ | ०१ |
| ०४ | बी.ई. बिलोमोरीया ॲण्ड कं. लि., पुणे | ४५३३/ दि. २०/०२/०६ | ०१ |

वरील चार निविदाव्यतिरिक्त शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि., मुंबई यांचेकडील एक बंद पाकीट दि. ०१/०२/२००६ रोजी (आवक क्र. २८८४) प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले असून त्यास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

याबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत दिनांक ०४/०३/२००६ रोजी सविस्तर चर्चा होउन निर्णय क्र. ११२ अन्वये उपरोक्त निविदा न उघडता सार्वजनीक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करण्यात यावा व मान्यता मिळाल्यानंतर कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेल्या सहा ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले आहे.

उपरोक्त बांधकामाचे सुधारित अंदाजपत्रकाची तांत्रिक छाननी सा.बनं.प्रादेशिक कार्यालयाकडून दि.०५/०४/२००६ रोजी पूर्ण झालेली आहे. त्यानुसार अंदाजपत्रकाची एकूण किमंत रु.१४,७०,१३,८५२.०० मात्र इतकी आलेली आहे. सदर अंदाजपत्रकानुसार प्रकल्पाचे आर्किटेक्ट शक्ती परमार ॲण्ड असो., मुंबई यांचेकडून सुधारीत निविदा प्रपत्रे तयार करुन घेण्यात येत आहेत.

मा.सहाय्यक मुख्य अभियंता,यांनी जा.क्र.का/३/इमारती/४२/१३३२/२००६, दि.०५/०४/२००६ चे पत्राव्दारे एम.पी.डब्ल्यू मॅन्युअल न्नुसार अंदाजपत्रकाच्या किमंतीचे १.२५% म्हणजेच रु. १८,३७,६७३.०० मात्र एवढी रक्कम कार्यकारी अभियंता,सा.बनं. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयास धनादेशाव्दारे तातडीने जमा करावी असे कळविले आहे. त्यान्नुसार तांत्रीक तपासणी फी जमा करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

उपरोक्त अंदाजपत्रकातील Sanitary & Plumbing कामाचा बहुतांश बाबींचे दर दरसुची मध्ये उपलब्ध नव्हते. त्यामुळे P.W.D. DSR व M.J.P. DSR यामधील ज्याबाबी काही प्रमाणात मिळत्या जुळत्या आहेत, त्याबाबींचा अंदाज पत्रकात समावेश करण्यात आला. तसेच काही बाबी अंदाज पत्रकातून वगळण्यात आल्या. त्यामुळे प्रादेशिक कार्यालयाचे छाननीनंतर या कामाची किमंत सुमारे रु. ५६ लक्षने कमी झालेली आहे.

तांत्रिक मंजुरी आदेशान्वये (जो अद्याप प्राप्त झालेला नाही) इमारतीचे आर.सी.सी. डिझाईन मा. अधिक्षक अभियंता, सा.बनं.मंडळ, अहमदनगर यांचेकडून तपासून घेण्यात यावे अशी अट नमूद करण्यात आली आहे. सादर केलेले R.C.C Design हे Heavy असल्याने त्याची तपासणी केल्यानंतर अंदाजपत्रकाची किमंत अजून कमी होण्याची शक्यता आहे असे मत सा.बनं. विभागातील अभियंत्यांनी समक्ष चर्चेदरम्यान व्यक्त केलेले आहे.

वर नमूद केलेप्रमाणे व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ११२ दि.०४/०३/२००६ अन्वये यापूर्वी कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेल्या ०६ ठेकेदारांना जा.नं.४८८३,४८८४ दि. १२/०४/२००६ चे पत्राव्दारे सुधारीत कोरे निविदा फॉर्म संस्थानचे मुंबई कार्यालयातून घेणेबाबत कळविणेत आले. कोऱ्या निविदा घेणेसाठी दि. १५/०४/२००६ ते दि. १८/०४/२००६ पर्यंत मूदत देण्यात आली होती. सदर मूदतीत खालील पाच ठेकेदारांनी कोऱ्या निविदा घेतल्या आहेत.

०१.	युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि, मुंबई
०२.	आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे
०३.	बी.जी. शिर्के, कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.पुणे
०४.	बी.ई. बिलीमोरीया ॲण्ड कं. लि., पुणे
०५.	शापूरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., मुंबई

सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. २१/०४/२००६ अखेर मूदत देण्यात आलेली आहे. सदर मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा दि. २४/०४/२००६ रोजी दुपारी ३.०० वाजता शिर्डी येथे उघडण्यात येतिल असे निविदासादरकर्त्यांना उपरोक्त पत्राव्दारे कळविण्यात येऊन त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी आजचे सभेपुढे बोलविण्यात आले होते. मुदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा निविदासादरकर्त्यांसमक्ष आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन, त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये काही सूट द्यावयाची अथवा बदल करावयाचा असल्यास त्यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**Comparative statement of Tenders**

Estimated Cost :- Rs. 13,99,97,360/- E.M.D. Rs.14,00,000/-

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केले दर |
|---|---|---|---|
| 01 | M/s.Shapoorji Pallonji & Co.Ltd., Nashik | 38% above | No Change |
| 02 | M/s.Unity Infraprojects Ltd., Mumbai | 39% above | No Change |
| 03 | M/s.IVRCL Infrastructures & Projects Ltd., Pune | 27% above | No Change |
| 04 | M/s.B.E.Billimoria & Co. Ltd., Mumbai | 69% above | No Change |

यावर सविस्तर चर्चा होऊन,अ.न.०३ चे M/s. M/s.IVRCL Infrastructures & Projects Ltd., Pune यांची न्युनतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच संस्थानचे वतीने प्रत्यक्ष कामावर दैनंदिन देखरेख ठेवणे, गुणवत्ता व बिले तपासणे, नियोजित वेळेत प्रोजेक्ट पूर्ण करुन घेणे इत्यादी कामी मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि.,(टाटा कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट) या प्रतिथयश कंपनीची कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट म्हणून नेमणूक करावी अशी सूचना मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव यांनी मांडली त्यास मान्यता देण्यात आली. याकामी येणाऱ्या योग्य खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०४. शिरडी येथे श्री साईबाबा संस्थान,शिरडी यांचे आर्थिक सहाय्यातून अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी सर्कीट हाऊस (विश्रामगृह) बांधणे बाबत.**

**निर्णय क्र.२६२.** शिर्डी येथे श्री साई दर्शनासाठी देशातून तसेच परदेशातून सुध्दा अनेक भाविक भक्त येत असतात. त्यात अनेक अतिमहत्वाच्या व्यक्तींचा समावेश असता अतिमहत्वाच्या व्यक्तींची निवासाची सोय सध्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील विश्रामगृहात केली जाते. उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी सध्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विश्रामगृहामध्ये फक्त सहाच कक्ष असल्यामुळे अनेक अतिमहत्वाच्या व्यक्तींची निवासाची सोय करणे शक्य होत नाही. त्यासाठी सध्याचे सार्वजनीक बांधकाम खात्याकडील विश्रामगृहाचे शेजारील शेती महामंडळाची जागा वर्ग करुन घेता येईल व त्याठिकाणी विश्रामगृह, वाहनतळ, पाणी निचरा व्यवस्था इ. सुविधा निर्माण करता येउ शकतील.

याकामी सार्वजनीक बांधकाम विभाग संगमनेर यांचेकडून आराखडे, अंदाजपत्रक तयार करुन मा. जिल्हाधिकारी यांनी पत्रासोबत जोडून पाठविले आहे. विश्रामगृहाचे अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी अंदाजे २६ कक्ष प्रस्तावित असून याकामासाठी अंदाजित रक्कम रुपये ०५ कोटी अपेक्षित आहे. विश्रामगृहाचे बांधकाम सार्वजनीक बांधकाम विभागाकडून करण्यात येईल व बांधकाम पूर्ण झ ाल्यानंतर दैनंदिन व्यवस्था, देखभाल याबाबी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हातळल्या जातील असे त्यांनी सांगीतले आहे.

तरी मा. जिल्हाधिकारी यांनी दि. १७/०३/२००६ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथील सदर विश्रामगृह बांधकामासाठी अंदाजे रु. ५.० कोटी उपलब्ध करुन देणेस विनंती केली आहे. याकामी निधी उपलब्ध करुन देणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी ) अधिनियम २००४ मधिल कलम २१ पोट-कलम (२) नुसार राज्य शासनाची पूर्व मंजुरी घ्यावी लागेल. असा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

या विषयावर चर्चा करीत असताना पुढील बाबींचा प्रामुख्याने विचार करणेत आला. श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या व्ही.आय.पी./ व्ही.व्ही.आय.पी व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

अशा भेट देणाऱ्या व्ही.आय.पी./ व्ही.व्ही.आय.पी व्यक्तींची व्यवस्था करणेसाठी शासकीय विश्रामगृहात पुरेशी निवासस्थाने उपलब्ध नाहीत. यामुळे संस्थान व्यवस्थेवर अतिरिक्त भार/ ताण नेहमी पडत असतो. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने विस्तारीकरणासाठी निधी अंदाजे रक्कम रु. २.३५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देणेस तसेच, यासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाची

विहीत मंजूरी घेऊन सध्याचेच शासकीय विश्रामगृह इमारतीवर पहिल्या मजल्यावर आवश्यक कक्ष बांधून देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०५. शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६३.** शिर्डी शहरात रस्ते विकास प्रकल्प योजना राबविण्याचे दृष्टीने तसेच याकामी शिर्डी शहराचा विकास आरखडा तयार करणे बाबत उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मार्यादीत यांचे समवेत बैठक घेवून विकास आराखड्यामध्ये रस्त्यावरील फूटपाथवर अतिक्रमण होऊ नये मंदिराचे बाजुने असलेल्या परिसरात पादचारी क्षेत्र ठेवणे, कॅम्पींग ग्राउंडची व्यवस्था करणे. रस्त्यांचे सुशोभिकरण, बगीचा इत्यादी महत्वाच्या बाबी विचारात घेण्यात याव्या याकरीता संस्थानचे आराखड्याचे अंमल बजावणीसाठी आवश्यक निधीपैकी गुंतवणुकीच्या स्वरुपात जास्तीत जास्त विस टक्के पर्यंत अंशदान करावे. आराखडा तयार करण्याचे दृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सल्लागार सी.पी.जी. कन्सलटंट, बेंगलोर यांनी शिर्डी येथे भेट देवून परिसराची पहाणी केली होती. दरम्यान महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत यांचे मार्फत विकास आराखडा प्राथमिक स्वरुपात सादर करण्यात येत आहे अशी चर्चा झाली होती.

शिर्डी शहरात रस्ते विकास प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे माध्यमातून राबविणे बाबत मा. नामदार अनिल देशमुख, मंत्री सार्वजनिक बांधकाम (सा.ड) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या), मुंबई यांचे दालनात दि. २८/०३/२००६ रोजी बैठक झाली. सदर बैठकीस मा. जयंतराव ससाणे, अध्यक्ष, मा. श्री. कैलास कोते,नगराध्यक्ष, शिर्डी नगरपचांयत, समिती सदस्य, मा.डॉ.प्यारेलाल तिवारी, मा.के.सी.पाण्डेय उपस्थीत होते. सदरच्या प्रस्तावास गती देण्याचे दृष्टीने झालेल्या चर्चेत शिर्डी शहरातील प्रमुख सात रस्त्यांचे व इतर डी.पी. रस्त्यांचे भूसंपादनाची कार्यवाही शिर्डी नगरपंचायत यांनी करावी. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रकल्प अहवाल तयार करणे, कामाचे टप्पे निश्चित करणे, त्यानुसार रस्त्याचे बांधकाम करणे, शासन स्तरावरुन मान्यता मिळविणे इत्यादी कामे करण्यात येणार आहेत. याकामी सर्व खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांनी करावा, असे उपरोक्त झालेल्या चर्चेत अपेक्षित असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेत येऊन संस्थानतर्फे यापूर्वी शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले सात रस्ते व इतर डी. पी. रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे माध्यमातून टप्प्या टप्प्याने विकसीत करणेत मान्यता देणेत आली. सदर रस्ते भू-संपादनसह विकसीत करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेतर्फे निधी देणेत यावा. सदर प्रकल्पाबाबत रस्ते विकास महामंडळ यांचेशी करारनामा करणेत यावा. प्रकल्पाचे टप्प्यानुसार खर्चाचे दहा टक्के रक्कम करारनामा झालेनंतर रस्ते विकास महामंडळा यांना आदा करणेत यावी. उर्वरित रक्कम कामाचे प्रगतीनुसार आदा करावी, असे ठरले.

याकामी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०६. मौजे शिर्डी येथील स.नं.१०८ मधील क्षेत्र भू-संपादनाने घेणेकामी बिनव्याजी ठेव म्हणून मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर विभाग श्रीरामपूर यांचेकडे रक्कम जमा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६४.** **(अ)**मे.साई गोपी असोसिएटस् व मे.साई गोपी रिसोर्टस् (श्री.बच्छानी) यांची मौजे शिर्डी येथील स.नं. १०८/१/१, १०८/१/२, १०८/१/३ व १०८/१/४ मधील ०३ हेक्टर ७८ आर १७ चौरस मीटर क्षेत्राचे भू संपादनाचे प्रकरण मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपुर विभाग यांचेमार्फत सुरु आहे.

तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक १२-१३ जुलै,२००३ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक २८८ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झालेले आहे -

'प्रकरण ०५ स.नं.१०८/१/१ ते १०८/१/४ क्षेत्र ०३ हेक्टर ७८ आर १७ चौरस मीटर शैक्षणिक उपक्रमासाठी संपादीत करावयाची जमिनीची किंमत रुपये ८,५९,२०,२२४/- एवढी मोठी होत असून, त्यामध्ये प्रत्यक्ष निवाडयाचे वेळी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर भूसंपादनाचे प्रकरण सोडून देऊन ते रद्द करण्यात यावे' असे ठरले. मात्र मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडून सदरचे प्रकरण रद्द झालेबाबत आदेश आलेला नाही.

**(ब)** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च,२००६ रोजी झालेल्या सभेत सदरील जमीनीचा विषय विचारार्थ सादर करणेत आला होता. यासभेतील निर्णय कमांक १०८(३) नुसार पुढील प्रमाणे निर्णय झालेला आहे -

यावर सविस्तर चर्चा होऊन, 'सदरहु जमीन कन्सेन्ट ॲवार्डने घेण्यात यावी असे ठरले. मा. कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू जमीन आता कन्सेन्ट ॲवार्डने घेत आहे असा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना पाठवावा.'

उपरोक्त निर्णयाप्रमाणे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना इकडील पत्र जा.क्र.वशी/बांधकाम/भूसंपादन/४३८४/२००६ दिनांक ३१ मार्च, २००६अन्वये मे. साई गोपी असोसिएटस् व मे. साई गोपी रिसोर्टस् यांचे स.नं.१०८/१/१ ते १०८/१/४ मधील क्षेत्र ०३ हेक्टर ७८ आर १७ चौरस मीटर जमीन कन्सेन्ट ॲवार्डने भूसंपादन करणेबाबतचे प्रकरण पुनःश्च सुरु करणेबाबत विनंती करणेत आलेली आहे. तसेच सदर पत्राची प्रत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांना

पाठविण्यात आलेली होती. मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडील आदेश क्र.भूसं/कार्या/१६अ/ ३५३/ २००६, दिनांक ०७ एप्रिल,२००६ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ४ अन्वये नव्याने भूसंपादनाची अधिसुचना काढणेस मान्यता दिलेली आहे.

**(क)** मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर विभाग,श्रीरामपूर यांचेकडील पत्र जा.क्र. कावि/भूस२/८४८/२००६ दिनांक ०५ एप्रिल,२००६ अन्वये असे कळविले आहे की, शासन निर्णय क्रमांक एलक्यूएन-१८/२००/प्र.क.१२१/अ २ दिनांक १४ जून,२००१ नुसार अंदाजित मोबदला रकमेच्या २/३ रक्कम रुपये ५,८०,५५,५०८/- (अक्षरी रुपये पांच कोटी ऐंशी लाख पंचावन्न हजार पांचशे आठ मात्र) बिनव्याजी ठेव म्हणून सत्वर त्यांचेकडे जमा करावी. जेणेकरुन त्यांना सदर प्रकरणी भूसंपादनाबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

यापुर्वी पाठविलेल्या भू-संपादनाच्या प्रस्तावामध्ये उपरोक्त जमिनी ह्या शैक्षणिक उपक्रमासाठी भूसंपादन करावयाचे प्रयोजन नमुद केलेले आहे. त्याऐवजी शैक्षणिक उपक्रम तसेच साईभक्तांची निवासस्थाने व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या विविध उपक्रमासाठी संपादित करावी, असे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना कळविणे आवश्यक असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

त्यावर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

(१) मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांनी भू-संपादनापोटी मागणी केलेली रक्कम रुपये ५,८०,५५,५०८/- (अक्षरी रुपये पांच कोटी ऐंशी लाख पंचावन्न हजार पांचशे आठ मात्र) त्यांचेकडे बिनव्याजी ठेव म्हणून त्वरीत भरणा करणेत यावी.

(२) यापुर्वी पाठविलेल्या भूसंपादनाच्या प्रस्तावामध्ये उपरोक्त जमिनी ह्या शैक्षणिक उपक्रमासाठी भूसंपादित करणे ठरले होते. त्याऐवजी शैक्षणिक उपक्रम तसेच साईभक्तांची निवासस्थाने व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या विविध उपक्रमासाठी संपादित करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा भू-संपादन अधिकारी, श्रीरामपूर यांना कळविणेत यावे.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०७.** **वार्षिक औषधे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२६५.** श्रीसाईनाथ व साईबाबा रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २००६-२००७ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण फिल्म्स, डेंटल मटेरीयल, त्वचा रोग विभाग, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब ओ.टी., कार्डीयाक ओ.टी., सि.टी.स्कॅन इत्यादी खरेदीकामी प्रत्येक विभागाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची सभा दि. १९/०१/२००६ रोजी आयोजित करण्यात आली होती.

सदर वैद्यकिय अधिकाऱ्यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांचा तक्ता सादर करण्यात आला होता. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव / शिल्लक असलेली मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी करुन व नविन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | सुत्राप्रमाणे निव्वळ मागणी रक्कम रुपये | वरीष्ठ प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे रक्कमरुपये |
|---|---|---|---|
| १ | गोळया | ९९६०५३.२७ | ५०८९६७५.०० |
| २ | इंजेक्शन व आय. व्ही. फ्ल्युडस् | १६३४५३७.८५ | ४११४०८९.१० |
| ३ | लिक्विड ओरल्स् | १६११५३.९५ | ४८४२०५.६५ |
| ४ | मलम | ९५६८५.२९ | ७४५७९५.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | आय, एअर, व नोझल ड्राप्स | १५२४८८.९६ | ३५०३१२.५० |
| ६ | लॅब केमीकल्स | ८९९६२०६.७२ | १९६२०००.५५ |
| ७ | ब्लड बँक केमीकल्स | ६१७७०३.४५ | १३५१८७०.९० |
| ८ | ओ.टी. आणि इतर मटेरीयल | १८१२७२४.९४ | ५००५७७५.८० |
| ९ | कॅटगट ॲन्ड सुचर्स | ८८०८७७.३४ | २९३१९०६.०३ |
| १० | डेंटल मटेरीयल | १२०९८.२२ | ३२८०१.०० |
| ११ | क्ष-किरण फिल्म्स् | २२३७८६.३४ | २५४१५६.३५ |
| १२ | सी.टी. स्कॅन फिल्म्स् व इंजेक्शन | नविन मागणी | ५०२५०५.०० |
| १३ | आयुर्वेदीक औषधे | २१८६९५.९८ | २८०७०४.१६ |
| १४ | कॅथलॅबसाठी लागणारी इंजेक्शन | नविन मागणी | ३२१४२४.५० |
| १५ | कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य | नविन मागणी | ३५९६४७६१.९० |
| | एकुण रक्कम रु. - | १५८०२०१५.५१ | ५९३९१९८३.९४ |
| | पुर्णांकित एकुण रक्कम रु. - | १५८०२०१६.०० | ५९३९१९८४.०० |

सदरची मागणी तयार करताना नेहमीच्या नियमाप्रमाणे म्हणजे गेल्या ३ वर्षाचा खप (सन २००३-२००४, २००४-२००५, २००५-२००६) यांची सरासरी करुन त्यावर २० % वाढ धरुन तयार केलेली आहे अशी मागणी सोबतच्या तक्त्यात रकाना क्र. ०९ मध्ये दर्शविलेली आहे. रकाना क्र. ०८ मध्ये दि.१५/०३/२००६ रोजी औषध भांडारात असलेल्या प्रत्यक्ष साठयाची शिल्लक दर्शविलेली आहे. तर रकाना क्र. ११ मध्ये निव्वळ मागणी दर्शविलेली आहे. (रकाना क्र. ९ वजा ८) त्यान्नुसार सदरचे खरेदीस एकुण पुर्णांकित रक्कम रु.१,५८,०२,०१६/- ( अक्षरी रु. एक कोटी अठ्ठावन्न लाख दोन हजार सोळा मात्र) पर्यंत खर्च येणार आहे.

वरीष्ठ प्रशासक यांनी रुग्णालयातील औषधांची अतिरीक्त मागणी करतेवेळी खालील बाबींचा विचार करुन मागणीमध्ये वाढ सुचविलेली आहे.

१) मागील तीन वर्षाची बाहयरुग्ण व अंतरुग्ण विभागातील रुग्णांची वाढती संख्या खालीलप्रमाणे आहे.

अ) सन २००३-२००४ बाहयरुग्ण संख्या - २१७५४८ अंतरुग्ण संख्या - ४५४३९

ब) सन २००४-२००५ बाहयरुग्ण संख्या - २४२७१७ अंतरुग्ण संख्या - ५३९९८

क) सन २००५-२००६ बाहयरुग्ण संख्या - २४०७०० अंतरुग्ण संख्या - ५७७४६

२) आयुर्वेदीक विभागासाठी आयुर्वेदीक औषधांची मागणी करताना आयुर्वेदीक डॉक्टरांच्या सल्ल्याने व मागील तीन वर्षाचा औषधांचा झालेला खप व शिल्लक साठा इत्यादींचा विचार करुन मागणी सुचविण्यात आली आहे.

३) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, गोळ्या इत्यादीची एकत्रीत मागणी केलेली आहे. त्यामुळे यावर्षी औषधांच्या एकुण मागणीची रक्कम वाढवुन दिसत आहे.

४) श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी लागणारी केमीकल्स यांचा आपणास काहीच अंदाज नसल्यामुळे सध्या मागणीमध्ये प्रत्येकी एक एक नगाची मागणी केलेली आहे. त्यांचे दर मंजुर झाल्यानंतर त्याच मंजूर दराने लागणारी केमीकल्स संबंधीत पुरवठाधारकांकडून मंजूर दराने खरेदी करता येतील.

५) श्रीसाईबाबा रुग्णालयात नविन कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर हे दोन विभाग नविनच चालू करण्यात येत आहे. तेथे बरीच महागडी सर्जीकल साहित्य लागतात. (उदा- डायग्नोस्टीक कॅथेटर, स्टेन्ट , व्हॉल्व, ऑक्टोपस, सुचर्स मटेरियल, परफ्युजीनीस्ट यांना लागणारे साहित्य) यांची स्वतंत्र मागणी तयार करण्यात आली असून त्यासाठी अंदाजे रु. ३,५९,६४,७६१.९०/- इतका खर्च येणार आहे.

६) श्रीसाईबाबा रुग्णालयात आपण २०% रुग्ण व संस्थान कर्मचारी आणि त्यांचे अवलंबित यांना मोफत उपचार करणार असल्याने १५% रुग्णांचे सवलतीत उपचार करणार असल्याने त्यांना लागणारी औषधे संस्थानतर्फे पुरवण्यात येणार आहेत.

७) रुग्णालयामध्ये दर चार महिन्याने होणारी शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, रोडवरील अपघात इ. मुळे वाढणारी गर्दी (उदा. उत्सव, अध्यात्मीक शिबीरे, फिरते वैद्यकिय पथक, पालखी सोहळा)

८) माहे जुलै-२००३ मध्ये रुग्णालय हे नविन धर्मशाळा येथे शिफ्ट करण्यात आल्याने २००३-०४ या वर्षामध्ये अंतर्रुग्ण व बाह्यरुग्ण विभागाची संख्या थोडी कमी दिसत आहे. तथापी सन २००४-०५ मध्ये वाढ झालेली आहे व २००५-०६ या वर्षात बाह्यरुग्णांची संख्या गतवर्षापेक्षा थोडी कमी झालेली आहे.

तर अंतररुग्णांची संख्या गतवर्षापेक्षा ३०४२ ने वाढलेली आहे. तेंव्हा त्याचा विचार करुन औषधांची मागणी करण्यात आलेली आहे.
९) ज्यावेळेस रुग्णालयात काही औषधे उपलब्ध नसतात अशा वेळेस ती रुग्णांना बाहेरुन विकत आणणेस सांगितले जाते. परंतू ती औषधे सुध्दा रुग्णालयात लागतात. तसेच नविन रुग्णालयात ऑपरेशन थिएटरची संख्या वाढली असून किमान ६ ऑपरेशन थिएटर्स कार्यरत राहणार आहेत. ती कार्यान्वीत झाल्यानंतर तेथे फ्युमिगेशन वगैरे इत्यादीसाठी लागणारे साहित्य उदा- फार्मोलीन, पोटॅशियम परमॅगनेटची स्टरीलाईजेशन लिक्वीड इत्यादी मागणी वाढलेली आहे.
१०) सध्या औषध भांडारात शिल्लक असलेली औषधे व पेन्डींग असलेली ऑर्डर इत्यादींचा देखील औषधे मागणी करताना विचार करण्यात आला आहे.

औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजुर दराने संस्थानने औषधे खरेदी केलेले आहे ते दर केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर ह्या पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. गतवर्षी औषधे खरेदीवर एकुण रु.१,२१,९०,०७५/- इतका खर्च झालेला आहे.

औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने औषधे खरेदीकामी दरवर्षीप्रमाणे मागील वर्षी देखील खालील प्रमाणे पध्दत अवलंबविण्यात आली होती.
१) दरपत्रक मागवितांना उत्पादक कंपन्यांची अट तशीच ठेऊन सर्व उत्पादक कंपन्या अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने निविदा पाठविण्यात येऊन त्यांचे देखील दर मागवण्यात आले होते.
२) सर्वच निविदाधारकांना निविदा उघडणेचे वेळेस वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले होते. जे निविदाधारक वाटाघाटीसाठी हजर नव्हते त्यांचे मुळ निविदेतील दर अंतिम धरण्यात आले होते.
३) निवडलेल्या सर्व कंपन्यांचे दर सर्वच औषधांकरीता तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात येऊन निम्नत्तम दराने पुरवठा आदेश देण्यात आला होता.
४) वाटाघाटीनंतरचा तुलनात्मक दरांचा तक्ता एकदाच व्यवस्थापन समितीपुढे ठेवून त्याच वेळी पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय घेण्यात आला होता.
५) मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची मागणी करण्याची आवश्यकता भासल्यास ती एकुण मागणीच्या २५ टक्के इतकी मागणी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात येत आहे.

उपरोक्त पध्दतीमुळे गतवर्षी सर्व औषधांना एकाच वेळेस दर प्राप्त होऊन सर्व औषधे एकाच वेळी खरेदी करण्यात आली होती व ती वेळेवर उपलब्ध झाली. सदर पध्दतीमुळे हा फायदा झालेला आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात वेळोवेही बदलणारे तज्ञ डॉक्टर्स व नव्याने कार्यान्वित होणारे विभाग यामुळे रुग्ण व त्यांचेसाठी लागणारी औषधे यांचा नक्की अंदाज येत नाही व त्यामुळे औषधांची मागणी कधी कमी होते तर कधी मागणीपेक्षा औषधे जास्त लागतात. तसेच श्री साईबाबा रुग्णालय हे नविनच चालु होत आहे. येथे येणाऱ्या रुग्णांचा व डॉक्टरांच्या मागणीचा काहीच अंदाज नाही. त्यामुळे अ.नं.५ या नियमात खालीलप्रमाणे बदल करावा असे नम्र मत आहे.

“मागणी केलेल्या औषधांचे दर मंजुर करुन घेऊन अतिरीक्त लागणारी औषधे २५% ऐवजी वेळोवेळी संबंधित निविदाधारकांचे मंजुर दरानुसार जेंव्हा जेंव्हा लागतील तशी तशी खरेदी करावीत.”

तरी तक्त्यांतील रकाना क्रमांक १३ नुसार (वरिष्ठ प्रशासक यांनी मागणी केल्याप्रमाणे) औषधे, केमीकल्स, साहित्य, कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य इत्यादी खरेदी करण्यास व रु. ५,९३,९१,९८४/- चे खर्चास व उपरोक्त प्रमाणे औषधे खरेदीची कार्यपध्दती अ.नं.१ ते ५ वर निर्णय होऊन, मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रवरा मेडिकल ट्रस्ट,लोणी येथे मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भि.खांबेकर तसेच संस्थानचे संबंधित अधिकारी यांनी समक्ष भेट देऊन तेथील औषधे-गोळ्या खरेदीकामी अवलंबिण्यात येणाऱ्या कार्य पद्धतीचा अभ्यास करुन ती आपणास स्वीकारार्ह असल्यास त्या पद्धतीप्रमाणे खरेदी करावी. दरम्यान दोन महिन्याकरिता रुग्णालयासाठी आवश्यक असणारी औषधे प्रचलित पद्धतीने खरेदी करण्यात यावीत, असें ठरलें.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय)

**विषय नं.०८. मशिनरी/उपकरणे दुरस्तीकामी कन्झुमेबल स्पेअर्स खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२६६.** श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/इक्वीपमेंटची दुरुस्ती व देखभाल रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजीनिअरींग विभागामार्फत केले जाते. यापैकी ऑपरेशन थिएटर, आय.सी.सी.यु., ओ.पी.डी., सर्जीकल वॉर्डस इत्यादी विभागातील मशिनरी/इक्वीपमेंटची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असते. सदरच्या दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टची तातडीने आवश्यकता असते. परंतू जेंव्हा मशिनरी / इक्वीपमेंट खराब होते. तेंव्हा ऐनवेळी सदरचा आवश्यक स्पेअर पार्ट काहीवेळेस मार्केटमध्ये मिळत नाही. त्यामुळे सदरच्या दुरुस्तीसाठी जादा वेळ लागतो व दैनंदिन कामकाज देखील बंद पडते. तसेच काही वेळेस सदरच्या पार्टसाठी जास्त किंमत द्यावी लागते.

जर नेहमी लागणारे आवश्यक असे स्पेअर्स पार्ट रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजीनिअरींग विभागात एक वर्षासाठीची खरेदी करुन ठेवले तर मशिनरी / इक्वीपमेंट दुरुस्तीस लागणारा विलंब कमी होईल. तसेच सदरचे स्पेअर पार्ट कोटेशन मागवुन खरेदी केल्यास वाजवी दरात देखील मिळतील. सदरचे खरेदीकामी अंदाजे रु.३,७७,१४६/- इतका खर्च येणार आहे. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे-

**SHRI SAINATH HOSPITAL,SHIRDI BIOMEDICAL ENGG. SECTION**

**Requirement of Spares which requires frequently.**

| Sr.No. | Item / Description | Qty | App.Rate per | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Bulb (Philips) | | | |
| | 250V/200W ( Threading) | 60 | 25 | 1500 |
| | Focusline Projection Lamp | | | |
| | 12V/50W | 60 | 140 | 8400 |
| | 24V/150W | 60 | 170 | 10200 |
| | 15V/150W | 24 | 160 | 3840 |
| | 6V/20W | 12 | 120 | 1440 |
| | 6V/10W | 6 | 120 | 720 |
| | Microscope Bulbs with Reflector | | | |
| | Philips Focusline 15V/150W | 24 | 450 | 10800 |
| 2 | Philips practitone bulb (threading) 230V/15W for keratometer | 6 | 15 | 90 |
| 3 | Bulb Holder for Philips Focusline Bulb- 5A | 36 | 20 | 720 |
| 4 | Laryngoscope Bulbs (3V) | 36 | 35 | 1260 |
| 5 | B.P.Apparatus Spares - | | | |
| | Rubber Bags | 24 | 60 | 1440 |
| | Cloth Bags | 12 | 85 | 1020 |
| | Metal Valve | 24 | 45 | 1080 |
| | Plastic Connector | 24 | 7 | 168 |
| | L & R Hinges with Screws | 24 | 12 | 288 |
| | Mercury | 400 | 10 | 4000 |
| | Glass Tube | 12 | 50 | 600 |
| 6 | Autoclave spares | | | |
| | Door Gasket 20"x 36" | | | |
| | 9KW (M.Shah ) | 24 | 700 | 16800 |
| | 9 KW (Natt) | 6 | 1100 | 6600 |
| 7 | Boiler Tank Gasket | 12 | 700 | 8400 |
| 8 | Autoclave Coils | | | |
| | 6KW | 6 | 2200 | 13200 |
| | 3KW | 18 | 850 | 15300 |
| 9 | O2 Flowmeter with Humidifier Bottle | 12 | 1100 | 13200 |
| 10 | Humidifier bottle with stainless steel connector for O2 Concentrator Machine | 12 | 400 | 4800 |
| 11 | Oxygen Tail Pipe | 12 | 1000 | 12000 |
| | N2O Tail Pipe | 6 | 1000 | 6000 |
| 12 | L & T Lunar ECG Cable - 3 Lead | 6 | 7000 | 42000 |
| 13 | L & T Micromon ECG Cable - 3 Lead | 6 | 7000 | 42000 |
| 14 | ECG M/C Cable (BPL) 108- 5 Lead | 12 | 1400 | 16800 |
| 15 | ECG M/C Clamp Set | 12 | 550 | 6600 |
| 16 | ECG Chest Electrode with baloon | 12 | 40 | 480 |
| 17 | ECG Battery = 6V, 3AH | 6 | 150 | 900 |
| 18 | Pulse Oximeter Probes | | | |
| | (L & T), Stellar Finger Probes with extension cable | 6 | 8500 | 51000 |
| | Datex Ohmeda- 3800 Finger Probes | 6 | 6500 | 39000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 19 | L & T Lunar monitor | | | |
| | NIBP Cuff | 6 | 1500 | 9000 |
| | NIBP hose | 3 | 3500 | 10500 |
| 20 | Schiller Monitor | | | |
| | NIBP Cuff | 3 | 1500 | 4500 |
| | NIBP hose | 3 | 3500 | 10500 |
| | | **Total Rs.** | | **377146** |

सदरचे स्पेअर पार्ट ही खालील विक्रेत्यांकडून कोटेशन मागवुन खरेदी करता येतील.

१. मे.अॅड्रॉईट मेडीकल सिस्टीम अॅण्ड सर्व्हिसेस ,पुणे
२. मे.अलमेड इक्वीपमेंटस,मुंबई
३. मे.साईट्रॉन्स मेडीकल इक्वीपमेंट, लोणी
४. मे.डॅटेक्स ओमेडा (इं) प्रा.लि.,मुंबई
५. मे.साई सर्जीकल,नाशिक
६. मे.एम.शहा अॅण्ड कंपनी,पुणे
७. मे.नॅट स्टील, मुंबई
८. मे.सिध्दार्थ इंजिनिअरींग कंपनी,मुंबई
९. मे.शिलर हेल्थकेअर,पुणे
१०. मे.सिस्टीम सर्जीकल,मुंबई
११. हॉस्पीकेअर,अहमदनगर

तरी वरील विक्रेत्यांकडुन तक्त्यात दर्शविलेप्रमाणे कन्झुमेबल स्पेअर पार्टच्या वार्षीक खरेदीकामी कोटेशन मागविण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये रु.३,७७,१४६/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय)

**विषय नं.०९. शिर्डी दर्शन व्ही.सी.डी.तयार करणेकामी प्राप्त झालेल कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२६७.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. द्वारा " शिर्डी दर्शन व्ही.सी.डी." २०,००० नग तयार करणेसाठी अंदाजे दर रुपये २०/-प्रमाणे येणारे अंदाजे रुपये ४,००,०००/- मात्र खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०३.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.३४ निर्णय क्रमांक १३८ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यान्नुसार " शिर्डी दर्शन व्ही.सी.डी." २०,००० नग तयार करणेकामी मुंबई येथील खालील नामांकित सी.डी.निर्मात्यांना जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/३४४४/२००६ दि.१०.०३. २००६ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली होती.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01 | M/s.A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai |
| 02 | M/s.San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03 | M/s.Sunrise Industries, Mumbai |
| 04 | M/s.Krunal Music Company, Mumbai |
| 05 | M/s.Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai |
| 06 | M/s.Sagarika Acoustronics Pvt.Ltd,<br>Navi Mumbai |
| 07 | M/s.Vandana Electronics, Mumbai |
| 08 | M/s.S.S.Enterprises, Mumbai |
| 09 | M/s.Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai |

उपरोक्त ९ कोटेशन धारकाव्यतिरिक्त श्री.सुधांशू लोकेगांवकर यांचे तोंडी निर्देशानुसार खालील निर्मात्यानाही कोटेशन देण्यात आली होती

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01 | Aftab Electronics Pvt.Ltd., Mumbai |
| 02 | KRCD (India) Pvt.Ltd., Mumbai |
| 03 | Melei Media , Mumbai |

उपरोक्त प्रमाणे एकूण १२ सी. डी. निर्मात्यांना कोटेशन पाठविण्यात आली होती त्यापैकी खालील निर्मात्यांची सिलबंद ५ व एक उघडलेले असे एकूण ६ कोटेशन प्राप्त झाले आहे.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01 | Aftab Electronics Pvt.Ltd., Mumbai |
| 02 | M/s. Vandana Electronics, Mumbai |
| 03 | KRCD (India) Pvt.Ltd., Mumbai |
| 04 | Krunal Music Company., Mumbai |
| 05 | Mihir Agencies Pvt Ltd., Mumbai |
| 06 | Melei Media , Mumbai |

वरीलप्रमाणे " शिर्डी दर्शन व्ही.सी.डी." तयार करणेकामी प्राप्त झालेली ६ (सहा) कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीचे आजचे सभेत उघडणेत आली त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | देऊ केलेले दर सर्व करांसहीत प्रती नग रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | Aftab Electronics Pvt.Ltd., Mumbai | 19.08 | पात्र (सोबत डी.डी जोडला आहे ) |
| 02 | M/s. Vandana Electronics, Mumbai | 17.00 | अपात्र (सोबत डी.डी जोडला नाही) |
| 03 | KRCD (India) Pvt..Ltd., Mumbai | 18.72 | पात्र (सोबत डी.डी जोडला आहे नाही) |
| 04 | Krunal Music Company., Mumbai | 23.92 | अपात्र (सोबत डी.डी जोडला नाही) |
| 05 | Mihir Agencies Pvt Ltd., Mumbai | 18.04 | अपात्र (सोबत डी.डी जोडला नाही) |
| 06 | Melei Media , Mumbai | 17.00 | पात्र (सोबत डी.डी जोडला आहे ) |

उपरोक्तप्रमाणे अ.नं.०२,०४ व ०५ यांनी कोटेशनसोबत डी.डी.जोडलेला नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले. उर्वरित पात्र कोटेशनसादरकर्त्यांपैकी न्यूनतम दरधारक अ.नं.०६ चे सी.डी.निर्माते, M/s. Melei Media, Mumbai यांना रुपये १७/- प्रती नगाप्रमाणे व्हीसीडी तयार करणेकामाचा कार्यादेश देणेत यावा, असें ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.१०.** **सन २००६-२००७ प्रसादालय व कँटीन किराणा माल खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२६८.** सन २००६-०७ मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.४० नुसार तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मागविणेत आलेल्या निविदेचे दोन्ही लिफाफे मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०१.०४.२००६ मध्ये उघडणेत आलेले आहे. तसेच मा.विश्वस्तांनी निवडलेले स्वीकारार्ह नमुने बाजुला ठेवण्यात आलेले आहे. निविदेतील शर्ती व अटीनुसार निविदेसोबत पुरवठा मालाचे एकुण किंमतीच्या १ टक्का किंवा रु.२५,०००/-यापैकी जी रक्कम जादा असेल त्या रकमेचा डी.डी. अथवा रोख रकमेची पावती व आवश्यक कागदपत्रे जोडावयास सांगितलेले होते. परंतु काही निविदाधारकांनी पुरेसे कागदपत्रे जोडलेली नाहीत व बयाणा रक्कम भरलेली नाहीत. त्याचा सविस्तर तपशिल सोबतच्या परिशिष्टात सादर केलेला आहे तसेच संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| ०१. | धरम एंटरप्राईजेस, नाशिक | रु. ५,५००/- काही कागदपत्रे नाही |
| ०२. | गुरुकपा सोप अॅण्ड केमिकल्स, अहमदनगर | काही कागदपत्रे नाहीत |
| ०३. | हनुमान सोप प्रॉडक्टस, भोकर ता.श्रीरामपूर | रु. १,५७५/- |
| ०४. | धनलक्ष्मी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | काही कागदपत्रे नाहीत |
| ०५. | स्पार्क केमिकल्स अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद | काही कागदपत्रे नाहीत |
| ०६. | भाउसाहेब दामोधर नालकर, तिसगांव | काही कागदपत्रे नाहीत |
| ०७. | संजय ट्रेडींग कंपनी, कोपरगांव | बयाणा रक्कम,कागदपत्रे नाहीत |
| ०८. | गोपाल एजन्सी, कोपरगांव | काही कागदपत्रे नाहीत |
| ०९. | प्रेमराज माणिकचंद अॅण्ड ब्रदर्स, पुणे | काही कागदपत्रे नाहीत |
| १०. | मार्केट मेकर्स, पुणे | रु.१५,०००/-, कागदपत्रे नाहीत |
| ११. | विठ्ठलराव रंगनाथ चव्हाण, देवळाली प्रवरा | काही कागदपत्रे नाहीत |
| १२. | एस.एम.भंसाळी, सिडको, नाशिक | काही कागदपत्रे नाहीत |
| १३. | शितल एजन्सीज, लोणी बु. ता.राहाता | बयाणा रक्कम,काही कागदपत्रे नाही |
| १४. | इंडीयन डिसेबल सर्व्हिसेस, मुंबई | रु. २,६१०/- |

उपरोक्तपैकी क्र.७ व १३ यांनी नियमानुसार बयाणा रक्कम भरलेली नाही तसेच क्र.१,३,१० व १४ यांनी रक्कम कमी भरलेली असल्याने त्यांचे निविदेचा विचार करता येणार नाही.

प्रत्येक मालाचे निवडलेल्या नमुन्यांचे संबंधित निविदाधारकांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता "परिशिष्ट अ" म्हणून सोबत जोडलेला आहे. तसेच प्रत्येक निविदाधारकांच्या निवडलेल्या एकुण नमुन्यांच्या दरांचा एकत्रित तक्ता "परिशिष्ट ब" म्हणून सादर केलेला आहे. ज्यांचे नमुने निवडून बाजूला ठेवणेत आलेले आहेत, त्यातील पात्र निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले होते.

त्यानुसार गावरान तूप व तांदूळ पुरविणेकामी निविदा भरलेल्या निविदसादरकर्त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर एकत्रित पाचारण करण्यात येऊन त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये काही सूट द्यावयाची अथवा बदल करावयाचा असल्यास तसे लेखी पत्र देणेबाबत सांगणेत आले.

उर्वरित किराणा माल पुरविणेकामी निविदा भरलेल्या संबंधित निविदासादरकर्त्यांना त्यांनी दिलेल्या नमुन्यांपैकी प्रत्येकी निवडून बाजूला ठेवलेल्या नमुन्यांची यादी वाचून दाखविण्यात आली व त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये काही सूट द्यावयाची अथवा बदल करावयाचा असल्यास त्यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या.

तसेच वरील क्र. १, ३, १० यांच्या निविदा विचारात घ्याव्यात असे ठरले.

उपरोक्तप्रमाणे चर्चा/वाटाघाटीअंती निविदासादरकर्त्यांनी दिलेले सुधारित दर व निवडण्यात आलेल स्वीकारार्ह नमुने यांची छाननी करुन प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी सन २००६-०७ या वर्षाकरिता आवश्यक असलेला खाण्यास योग्य व उत्तम प्रतीचा किराणा माल खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भि.खांबेकर या उपसमितीला प्रदान करण्यात आले. तसेच या समितीला संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक दैनंदिन साहित्य खरेदीकामी अधिकार देणेत आले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.११. रुग्णालयासाठी खुर्च्या खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६९.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालय "श्री साईबाबा रुग्णालय" या नावाने कार्यान्वीत होत आहे. त्यासाठी रुग्णालय विभागाने निलकमल कंपनीच्या मॉडेल नं.सीएचआर २०५१ च्या ३०० नग खुर्च्यांची मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.११.२००५ मधील निर्णय क्र.६८६ नुसार संस्थानचे साईनिवास अतिथीगृह व भक्तनिवासस्थान इमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या २००० फायबर खुर्च्या खरेदीकामी निलकमल कंपनीकडून कोटेशन मागविणेत यावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार निलकमल कंपनीच्या खुर्च्यासाठी मे.निलकमल प्लॅस्टीक लिमीटेड, मुंबई यांना जा.क्र. ७६ दि.०३.०१.२००६ अन्वये पत्र पाठवून काही निवडक नमुन्यांचे दर, रंग, वजन व इतर शर्ती-अटीबाबत सविस्तर पत्र मागविणेत आलेले होते. मे.निलकमल यांनी त्यांचे जा.क्र.एनपीएल/एएम/जीए/२००५-०६ दि.१३.०१.२००६ पत्रान्वये खालीलप्रमाणे दर दिलेले होते. त्याचा तपशिल-

| अ.नं | खुर्ची मॉडेल नंबर | मागणी | दर प्र.नग |
|---|---|---|---|
| ०१. | सीएचआर २०५१ | ११०० नग | रु.२९०/- |
| ०२. | सीएचआर २०६० | ३०० नग | रु.२४५/- |
| ०३. | सीएचआर ४००१ | ४०० नग | रु.२८४/- |
| ०४. | हेरीटेज | २०० नग | रु.४७०/- |

मे.निलकमल प्लॅस्टीक लिमिटेड, मुंबई यांचे प्रतिनिधीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मध्ये आमंत्रित करणेत आलेले होते. सदरील सभेमध्ये चर्चेअंती निर्णय क्र.४३ नुसार सीएचआर २०५१ मॉडेलच्या १९०० नग खुर्च्या रु.२८०/- प्र.नग दराने व हेरीटेज मॉडेलच्या १०० नग खुर्च्या रु.४६०/-प्र.नग दराने खरेदी करण्यात याव्यात असा निर्णय झालेला असल्याने मे.निलकमल प्लॅस्टीक लिमीटेड, मुंबई यांना पुरवठा आदेश देणेत आलेला असून त्यांनी मागणीप्रमाणे खुर्च्यांचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. श्री साईबाबा रुग्णालयासाठी आवश्यक असणा-या ३०० नग खुर्च्या खरेदीसाठी मे.निलकमल प्लॅस्टीक, मुंबई यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली असता ते पुरवठा करण्यास तयार असल्याचे सांगितले.

तरी मे.निलकमल प्लॅस्टीक लिमीटेड, मुंबई यांचेकडून निलकमल मॉडेल नं.सीएचआर २०५१ च्या ३०० नग खुर्च्या रु.२८०/-प्र.नग दराने खरेदीस व येणारे रक्कम रु.८४,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१२.** **पोलीस स्टेशन बॅरिकेट्ससाठी साहित्य खरेदी कामी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२७०.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.१२.२००४ मधील निर्णय क्र.१६३ नुसार पोलीस स्टेशन, शिरडी यांना श्री साईबाबांच्या दर्शनाच्या वेळी वाहतुकीचे नियमन करण्याकरीता २०० लोखंडी बॅरीकेटस तयार करुन देणेकामी आवश्यक असणारे जी.आय.पाईप, एम.एस.हार्डवेअर साहित्य व ऑईलपेंट खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.७,०३,६००/-चे खर्चास तत्वत: मान्यता मिळालेली आहे. सदरील प्रस्तावास मा.प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग, मंत्रालय,मुंबई यांचीशासन पत्र क्र.सासंवि-२००५/३९७/(६९)/सोळा दि.२८.१२.२००५ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सदर खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती दि.०४.०२.२००६ चे सभेत उघडून खालील निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ मध्ये चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले होते.

०१. मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक

०२. मे.स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक

०३. मे.एस.एल.एस.स्कोरोडाईट प्रा.लिमीटेड, मुंबई

उपरोक्त निविदाधारकापैकी दिनांक ०४/०३/२००६ रोजी फक्त मे.स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक हे उपस्थित होते. मे.एस.एल.एस.स्कोरोडाईट प्रा.लि., मुंबई यांनी फॅक्सद्वारे निविदेतील दरापेक्षा १०% दरवाढ मागितलेली होती आणि मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी निविदेतील दर ग्राहय धरण्यात यावे, असे दूरध्वनीवरुन कळविले होते.

उपरोक्त संदर्भात मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत चर्चा होऊन न्युनतम दराने पुरवठा आदेश देण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार मे.एशियन सेल्स कार्पोरेशन,नाशिक यांना रक्कम रु.७,७२,९१२/-चा पुरवठा आदेश देण्यापूर्वीच त्यांनी निविदेतील दरापेक्षा पाईपाच्या किंमतीत १०% व ॲंगलमध्ये ८% दरवाढ मिळावी असे पत्र दिल्याने त्यांना मालाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मात्र मे.स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांना रुपये ३०,४००/- किंमतीचे थिनर व जी.आय. बेंडचा पुरवठा आदेश पाठविणेत आलेला आहे. सदरचे पुरवठा आदेशानुसार ते माल पुरविण्यास तयार असून माल ट्रान्सपोर्टला टाकलेला असल्याचे त्यांनी दूरध्वनीद्वारे कळविलेले आहे. .

मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी निविदा भरल्यानंतर त्यांना समक्ष हजर राहणेस कळवूनही चर्चा वाटाघाटीस हजर न राहता अगर दरवाढीबाबत वेळीच काही एक न कळविता, त्यांचे सोयीनुसार नंतर निविदेतील दरापेक्षा वाढीव दराची मागणी करुन दुरध्वनीद्वारे माल पुरवठा करणेस त्यांनी असमर्थता दर्शविलेली आहे. परिणामी पोलीस स्टेशनला देण्यात येणारे बॅरीकेटस काम लांबणीवर पडलेले आहे. त्यामुळे त्यांचे नावाचा काळया यादीत समावेश करणेस, तसेच उर्वरीत साहित्य खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, फेरनिविदा मागणी करुन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१३.** **सन २००६-२००७ विद्युत्, पाणी पुरवठा, बांधकाम, बगीचा, स्वच्छता, कार्यालयीन स्टेशनरी व ध्वनीक्षेपण विभांगासाठी वार्षिक साहित्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२७१.** सन २००६-०७ सालामध्ये संस्थानचे विद्युत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बांधकाम,बगीचा,स्वच्छता विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभाग | रु.३३,२४,६६२.७५ |
| ०२. | स्वच्छता व बगीचा विभाग | रु. ६,६९,२५०.०० |
| ०३. | बांधकाम विभाग | रु. ३,३७,१७५.०० |
| ०४. | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी | रु.१३,९३,२४७.५० |
| | एकुण | रु.५७,२४,३३५.२५ |

उपरोक्तप्रमाणे सदर खरेदीस अंदाजे रु.५७,२४,३३५/-पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २ (झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

०१. विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल, हार्डवेअर साहित्य, प्लंबींग व मेंटेनन्स साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०२.	स्वच्छता व बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य, खते, औषधे व किटकनाशके साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०३.	बांधकाम विभागाचे खरेदीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे वाटते.

**अ)** सन २००५-०६ मध्ये मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लिमीटेड, पुणे यांना सिमेंट दरामध्ये सुट देणेबाबत पत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी रु.११/-प्रती गोणी सुट दिलेली होती. त्याप्रमाणे आजअखेर आवश्यकतेनुसार सिमेंट खरेदी करणेत आलेले आहे. यावर्षीही त्याचपद्धतीने सिमेंटची खरेदी करावी असे नम्र मत आहे. बांधकाम विभागाने १००० गोणी अल्ट्रा टेक, ए.सी.सी., राजश्री बिर्ला व अंबुजा सिमेंटची मागणी केलेली आहे.

**ब)** बांधकाम विभागासाठी आवश्यक असणारे खडी, वाळू, विटा, मुरुम इ. साहित्याची एकुण अंदाजे किंमत रु.१,०२,०००/-होत आहे. सबब परिसरातील पुरवठादारांकडून दर मागणी करुन स्थानिक विश्वस्त सभेमध्ये याबाबत निर्णय घ्यावा असे मत आहे.

**क)** उर्वरीत मेंटेनन्स साहित्याची एकुण किंमत रु.८५,१७५/- होत आहे. सबब सदर खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागणी करुन निर्णय घ्यावा असे वाटते.

०४.	कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्यामध्ये झेरॉक्स मशीनसाठी आवश्यक असणारे गेस्टेटनर इंक व मास्टर रोल हे गेस्टेटर कंपनी स्वतः वितरीत करीत असल्याने त्यांनी कोणताही अधिकत डिलर नेमलेला नाही. तरी त्यांचेशी पत्रव्यवहार करुन त्यांचेकडील साहित्य खरेदी करावे लागेल व उर्वरीत साहित्यासाठी निविदा मागणी करणेत येईल.

उपरोक्त प्रमाणे सन २००६-०७ साठी आवश्यक असणारे वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे तत्वतः मान्यतेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेत येईल. त्यानंतर संबंधितांशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेता येईल. तसेच बांधकाम साहित्य खरेदीसाठी क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

तरी वरीलप्रमाणे वार्षिक खरेदीस तत्वतःमान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१४.	एल.पी.जी.फायर हायड्रंट, लिकेज डिटेक्टर, इलेक्ट्रीक लिकेज डिटेक्टर यंत्रणा पुरवठा व उभारणीकामी आलेल्या वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७२.** प्रसादालयामध्ये दररोज सरासरी १६००० साईभक्तांचे प्रसादभोजन, १५ क्विंटल साखरेचे ६७,५०० नग मोतीचुर लाडू व ५००० नाष्टापाकीटे बनविणेकामी इंधन म्हणून एल.पी.गॅस चा वापर करण्यात येत आहे. त्याकामी गॅस साठवण टाकी, डिकॅन्टींग पंप, व्हेपरायझर, पाईपलाईन , वॉल्व्ह, बर्नर्स वगैरे यंत्रणा वापरीत आहोत. सदर यंत्रणेतून गॅस गळती होउन अपघात घडू नये अगर झाल्यास गॅस गळती सारखा प्रकार तात्काळ समजावा. त्याचप्रमाणे कदाचित गॅस गळती झाल्यास ताबडतोब नियंत्रित व्हावी. म्हणून फायर हायड्रंट लिकेज डिटेक्टर, इलेक्ट्रॉनिक लिकेज डिटेक्टर, फ्लो मीटर वगैरे यंत्रणा असावी असे मा.श्री. शि.वा. मुंडफन, सॅफिकॉन फायर ॲण्ड सेफ्टी सल्लागार, पुणे यांनी दि. १७/८/२००१ चे अहवालामध्ये नमूद केलेले होते. मात्र त्यावेळी कार्यवाही झालेली नसल्यामुळे दि. १७/४/२००५ चे सकाळ वृत्तपत्रात टिकात्मक वृत्त प्रसिध्द झाले होते.

गॅस गळती सारखा प्रकार होउन मोठा अनर्थ घडू नये म्हणून उपरोक्त यंत्रणा असणे गरजेचे असल्यामुळे तातडीने सदर यंत्रणा पुरवठा व उभारणीकामी निवीदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याकामी खालीलप्रमाणे ९ निवीदा आलेल्या होत्या.

१)	मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. , मुंबई
२)	मे.भारती एन्टरप्राईजेस , पुणे
३)	मे.इंडी. इंजिनीअर्स प्रा.लि. , मुंबई
४)	मे. मनोज फायर सर्व्हीसेस , पुणे
५)	मे. व्दीप एन्टरप्राईजेस , पुणे
६)	मे. युनायटेड फास्परस लि. , मुंबई
७)	मे. फायर ॲण्ड सेफ्टी सर्व्हीसेस , पुणे
८)	मे.कन्सेप्ट ईंजिनिअर्स प्रा.लि. , पुणे
९)	मे. अजय इंडस्टी , घाटकोपर

मा.व्यवस्थापन समितीचे दि.९/७/२००५ चे सभेमध्ये उपरोक्त निवीदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीकामी बोलविण्यात आलेले होते. दि.९/७/२००५ रोजी निवीदा उघडण्यात येउन

निवीदाधारकाशी चर्चा करण्यात आली. व त्यांना सांगण्यात आले की, आपण नमूद केलेल्या दरामध्ये आणखी काही सुट देणार काय? सुट देणार असल्यास सुधारीत दरपत्रक बंद पाकीटात देण्यास सांगितले. त्यानूसार उपस्थित निवीदाधारकांनी सुधारीत दरपत्रक दिलेले होते. सदर सुधारीत दरपत्रकातील निम्नतन दराची निवीदा मान्य करुन त्यांना विषयांकीत यंत्रणेचे पुरवठा व उभारणीचे काम देणेकामी स्थानिक विश्वस्त समितीस अधिकार देण्यात आलेले होते.

दि.१४/७/२००५ रोजी स्थानिक विश्वस्त समिती सभेमध्ये उपरोक्त १ ते ९ पैकी फायर ॲण्ड सेफ्टी सर्व्हीसेस , पुणे यांचे सर्वात कमी दर असल्याने त्यांची निम्नतन दराची निवीदा मान्य करण्यात आली व रु.४,३९,९३४/८५ खर्चास मंजूरी देण्यात आली होती. सदर खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १८/७/२००५ चे सभेमध्ये मंजुरी मिळालेली आहे.

दि.१४/७/२००५ चे स्थानिक विश्वस्त सभा व मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १८/७/२००५ चे सभेतील निर्णयानूसार मे. फायर ॲण्ड सेफ्टी सर्व्हीसेस, पुणे यांना विषयाकींत यंत्रणा पुरवठा व उभारणीचे काम देण्यात आले. मात्र मा.श्री. शि.वा.मुंडफन, सॅफिकॉन, फायर ॲण्ड सेफ्टी सल्लागार, पुणे यांनी दि. १७/८/२००१ चे अहवालामध्ये ज्या ठिकाणी (वाहन तळावरील विहीरीमध्ये) पंप बसविण्याचे नमूद केलेले होते. परंतू सदर विहीरीला पुरेसे पाणी नसल्याचे आढळून आले. जर तेथे ही यंत्रणा बसविली तर गैरसोईचे होईल.

त्याकामी पर्यायी ठिकाण म्हणून कनकुरी तलावाचे पाणी पुरवठा होत असलेल्या टाकीवर ( साईप्रसाद नं.२ चे पश्चिमेकडील) पंप बसविण्याचे फायर ॲण्ड सेफ्टी, सल्लागार, पुणे व संस्थान अधिका-यांनी निश्चीत केले. त्यामुळे उपरोक्त यंत्रणा उभारणीसाठी लागणा-या पाण्याचे पाईपलाईनची लांबी पुर्वीपेक्षा जास्त झाली.

पाईप लाईनची लांबी वाढल्याने जादा लागणारा पाईप व जादा पाईपलाईन उभारणीचे कामाची मजुरी यांचेत वाढ झाली.

| | | |
|---|---|---|
| पूर्वीचे अहवालानूसार पाईपलाईनची लांबी | - | ९६ मीटर्स |
| नवीन अहवालानूसार पाईपलाईनची लांबी | - | १८८ मीटर्स |

उपरोक्तप्रमाणे वाढ झालेल्या ९२ मीटर्स पाईपचे व वाढीव पाईपलाईनची मजुरीचा खर्च अनुक्रमे २५,१९४ + ४०, ००० /-असा एकुण रु. **६५ ,१९४/-** वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे प्रथम पत्रामध्ये CIDF १५० mm वॉल्व्ह व CIDF एन आर व्ही वॉल्व्ह बसविण्याचा रद्द केला होता. मात्र त्यांची गरज असल्याने ते २ वॉल्व्ह बसवून घेतलेले आहेत त्याची रक्कम अनुक्रमे ७४७०+ ७४७० = १४९४०/- वाढलेली आहे. ÷ सुट ८ % = ११९५.२० = **१३७४४/-**

| | | |
|---|---|---|
| १) | पाईपलाईन व मजुरीची वाढलेली रक्कम रु. | ६५ , १९४/- |
| २) | २ वॉल्व्हची रक्कम रु. | १३ , ७४४/- |
| | **एकुण =** | **७८ , ९३८/-** |

मुळ मंजूरीपेक्षा रु.७८,९३८/- एवढी रक्कम वाढलेली आहे. मुळ मंजुरीतील एकूण यंत्रणेमध्ये फ्लोमीटरचा उल्लेख केलेला आहे. मात्र आपणास जे फ्लोमीटर पाहीजे त्या तपशीलाचे फ्लो मीटर मुळ मंजुरीमध्ये नसल्याचे फायर ॲण्ड सेफ्टी सर्व्हीसेस , पुणे यांचे मत पडले जर नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे फ्लोमीटर बसविले तर संस्थानचा उद्देश सफल होणार नाही. सदर बाब मा.श्री. शि.वा. मुंडफन, सॅफिकॉन, फायर ॲण्ड सेफ्टी सल्लागार यांनीही मान्य केली आहे. त्यानूसार आपणास ज्या प्रकारचे फ्लो मीटरची आवश्यकता आहे. त्याचा तपशील श्री शि.वा.मुंडफन, सॅफिकॉन, फायर ॲण्ड सेफ्टी सल्लागार हे देणार आहेत. त्यामुळे मुळ मंजुरीमध्ये नमूद केलेले फ्लो मीटर बसविलेले नाही.

नविन फ्लो मीटरचा तपशील मिळाल्यानंतर स्वतंत्र प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात येईल.

| | |
|---|---|
| एकुण जादा झालेली खर्च रक्कम रु. - | ७८ , ९३८ /- |
| फ्लो मीटरची रक्कम रु. - | १७ , ४२९ /- |
| | **६१ , ५०९ /-** |

( अक्षरी रुपये एकसष्ट हजार पाचशे नऊ मात्र)

सदरहू यंत्रणा उभारणीकामी मुळ मंजुरीपेक्षा रु. ६१ ,५०९/- एवढी रक्कम जादा खर्च झालेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

दिनांक २४.४.२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-

**विषय नं.१५. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सत्र २००६ साठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७३.** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट २००६ चे सत्रापासून सुरू होणारे शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २००६ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी आतापासूनच करणेसाठी

प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. व्यवस्थापन समिती यांचेकडून होणे आवश्यक आहे.

**सन - १९९५ पुर्वी औ.प्र.संस्थेमध्ये उमेदवारांना प्रवेश देणेकामी आलेल्या अर्जांची एकत्रित जनरल मेरीट यादी तयार केली जात असे व उमेदवारांना गुणानुक्रमे प्रवेश दिले जात असत.** त्याकरीता शिर्डी मध्ये वास्तव्य असणा-या उमेदवारांना ५% गुण, तालुक्यात वास्तव्य असणा-या उमेदवारांना ३% गुण व अहमदनगर जिल्हयासाठी १% गुण अधिक देवून गुणवत्ता यादी केली जात असे.

**मा. श्री द.म. सुकथनकर, यांचे अध्यक्षतेखालील व्यवस्थापन मंडळाने १९९६ मध्ये प्रवेश पध्दतीत बदल करून** खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि. मी. त्रिज्येत येणा-या गांवातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत सर्व उमेदवारांना २० % जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला होता. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा. तसेच संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ यांचे निर्णयानुसार व शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दतीप्रमाणे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशासाठीचा व्यवसायनिहाय जागांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शिर्डी प शिडी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ३ | मशिनष्ट ग्राईण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, अ‍ॅण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | २२ | ०६ |
| १० | ट्रॅक्टर मॅकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | ३० | ०८ |
| | | | | १७६ | ३२ | १६४ | ४४ |

चालू वर्षी वरिल अ.क्र. १ चा व्यवसाय टूल अँड डाय मेकर याच्या दोन तुकडया अद्याप प्रशिक्षणात असल्याने त्या तुकडीला प्रवेश देता येणार नाही.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक -१८/०७/२००५ रोजी झालेल्या सभेत विषय नं.२५ निर्णय क्रमांक ३५६ अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला, त्यानुसारही शिर्डी व शिर्डी पासून १५ कि.मी. च्या गावातील उमेदवारांसाठी ८० % जागांचे वरिलप्रमाणे आरक्षण चालू ठेवलेले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत चालू वर्षी ०९ व्यवसायांचे प्रशिक्षणासाठी उमेदवारांना प्रवेश द्यावयाचा आहे. सर्व व्यवसायांना केंद्र शासनाची कायम मान्यता मिळालेली आहे.

वरील तक्त्यात दर्शविलेल्या सुपरन्युमररीच्या अतिरीक्त जागा भरणेसाठी मागील दोन वर्षात प्रशिक्षण सोडून गेलेल्या उमेदवारांचे प्रमाणास अनुसरून शासनाकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाकडून मंजूरी मिळाले नंतर या अतिरीक्त जागा भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते. या जागा भरण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळेलच असे नाही.

शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी. त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे आहेत. त्यानुसार १९९६ पासून या गावांना ८० % जागांवरील प्रवेश राखीव करण्यात आलेले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | २५ | बहादराबाद | ४९ | रांजणगांव-देशमुख |
| २ | साकुरी | २६ | शहापुर | ५० | अंजनापूर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | दहिगांव-को-हाळे | २७ | पोहेगांव खु | ५१ | बहादरपुर |
| ४ | पिंपळस | २८ | पोहेगांव बु | ५२ | मढी बु |
| ५ | को-हाळे | २९ | चांदेकसारे | ५३ | मढी खु |
| ६ | नांदुर्खी बु | ३० | घारी | ५४ | देर्डे-को-हाळे |
| ७ | नांदुखी खु | ३१ | डाउच खु | ५५ | देर्डे-चांदवड |
| ८ | डो-हाळे | ३२ | रास्तापुर | ५६ | चांदगव्हाण |
| ९ | कनकुरी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५७ | डाउच बु |
| १० | निमगांव-को-हाळे | ३४ | एकरूखे | ५८ | हिंगणी |
| ११ | निघोज | ३५ | गणेशनगर | ५९ | मुर्शतपुर |
| १२ | सावळीविहीर खु | ३६ | रांजणगांव | ६० | कोपरगांव |
| १३ | सावळीविहीर बु | ३७ | अस्तगांव | ६१ | धारणगांव |
| १४ | सोनेवाडी | ३८ | कालेवाडी | ६२ | जेउर पाटोदा |
| १५ | पिंपळवाडी | ३९ | संवत्सर | ६३ | जेउर कुंभारी |
| १६ | रूई | ४० | कोकमठाण | ६४ | शिंगणापूर |
| १७ | केलवड | ४१ | लक्ष्मणवाडी | ६५ | रामपूर |
| १८ | खडके-वाके | ४२ | कान्हेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १९ | काकडी | ४३ | वारी | ६७ | आडगांव |
| २० | डांगेवाडी | ४४ | देवगांव | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ४५ | पुणतांबा | ६९ | धनगरवाडी |
| २२ | सोयेगांव | ४६ | रामपुरवाडी | ७० | शिंगवे |
| २३ | वेस | ४७ | वाकडी | ७१ | सडे |
| २४ | जवळके | ४८ | मनेगांव | ७२ | शिर्डी |

शासनाने प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून उपलब्ध जागांपैकी खालीलप्रमाणे व्यवसाय निहाय जागा राखीव ठेवलेल्या आहेत.

अ - मागासवर्गीयासाठी राखीव जागा

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१)( जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम ) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्य जमाती ( एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |
| | | ५० % |

ब. अपंग उमेदवारांसाठी ३ % आरक्षण.

क. महिलांसाठी व्यवसाय निहाय २५ % आरक्षण.

ड. तांत्रिक विषयासह परीक्षा पास उमेदवारांना व्यवसाय निहाय २५ % आरक्षण

इ. संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % जागा राखीव.

फ. सर्टिफाईड ( बोल्स्टर ) स्कुलमधील व्यक्ती १% जागा राखीव.

उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यान्नुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

प्रत्येक उमेदवरास प्रत्येक वर्षाकरीता शैक्षणिक शुल्क रू. १५०० /- व अनामत रक्कम रू. ३००/- एवढी आकारण्यात येते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेतलेले काही प्रशिक्षणार्थी मध्येच प्रशिक्षण सोडून जातात त्यामुळे त्या जागा उर्वरीत कालावधीसाठी रिक्त राहतात व त्यामुळे गरजू उमेदवार प्रवेशापासून वंचित राहतात. सन २००३, २००४ व २००५ मध्ये प्रवेश दिलेल्या उमेदवारांमधून अनुक्रमे १९, ११ व २२ विद्यार्थी मध्येच प्रशिक्षण सोडून गेले आहेत. यामुळे संस्थान मार्फत विद्यार्थी प्रशिक्षणासाठी केला जाणारा खर्चही नाहक वाया जातो. यावर नियंत्रण आणणे कामी यावर्षी पासून प्रवेश घेणा-या उमेदवारांकडून बँकेचे रू. ५०००/- चे हमी पत्र घ्यावे लागेल.

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही

बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तिकेत बदल करण्यात येतो. चालू वर्षी पासून प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदल चालू वर्षी पासून प्रवेशाबाबत होणा-या माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील.

तरी उपरोक्तप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सत्र २००६ साठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला. तसेच प्रस्तावित केलेप्रमाणे यावर्षापासून प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांकडून रूपये ५०००/- अनामत रक्कम म्हणून प्रवेशाचेवेळी घेणेत यावी, असे ठरलें. (कार्यवाही-प्राचार्य,औ.प्र.संस्था)

**विषय नं.१६. MS-CIT अभ्यासक्रमांना प्रवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७४.** श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये महाराष्ट्र शासनाचा एमएससी आयटी (MS-CIT) संगणक कोर्स महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन, लि.( MKCL ) पुणे. यांचे मान्यतेने चालविला जातो. हा अभ्यासक्रम तीन महिने कालावधीचा आहे. त्याचे सत्र साधारणत: जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर या महिन्यांमध्ये सुरू होतात. ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना तसेच शासकीय सेवेतील कर्मचारी, महिला, व्यावसायीक, जेष्ठ नागरीक, खाजगी आस्थापनेतील कर्मचारी यांचेसाठी हा संगणक अभ्यासक्रम उपयुक्त आहे. या अभ्यासक्रमासाठी शिक्षणाची व वयाची अट नाही.

या अभ्यासक्रमाचे दोन पध्दतीने प्रवेश दिले जातात. आपले औ.प्र.संस्थेमध्ये महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन,लि.(MKCL)पुणे, यांनी जवळपास ५७० नियमित व ५२ बहि:स्थ जागा प्रवेशासाठी उपलब्ध केलेल्या आहेत. चालू सत्रामध्ये नियमित २५४ व १० बहि:स्थ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहेत.
१) हा अभ्यासक्रम तीन महिने संस्थेत येवून (Regular) शिकण्यासाठी शुल्क रू.२०१०/- मात्र ठेवणेत आलेले आहे. यापैकी संस्थेकरीता प्रति विद्यार्थी रू. १२५०/- मात्र महसुल प्राप्त होतो.
२) जे उमेदवार नोकरीच्या ठिकाणी संगणकावर काम करतात तसेच ज्यांचे घरी स्वत:चा संगणक उपलब्ध आहे अशा उमेदवारांसाठी बहि:स्थ ( Self Study ) म्हणून प्रवेश देण्यात येतो. या उमेदवरांची फक्त अंतिम परीक्षा संस्थेत घेतली जाते व शुल्क रू. ८६०/- मात्र ठेवण्यात आलेले आहे. यापैकी संस्थेकरीता प्रति विद्यार्थी रू. १००/- मात्र महसुल प्राप्त होतो.

महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन, लि. पुणे. यांनी आपले संस्थेमध्ये प्रवेशासाठी निश्चित केलेल्या जागेंमधून बहुतांशी जागा प्रवेशासाठी रिक्त राहतात. चालू सत्रात शिर्डी, सावळीविहीर, राहाता, दाढ, कोपरगांव येथून आपले संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी न येवू शकत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यात्या गावातील खाजगी संगणक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांनी त्यांचे मार्फत आपले संस्थेमध्ये प्रवेश देणेबाबत विनंती केली होती. या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण संबंधित संस्था त्यांचे स्वत:चे संस्थेमध्ये देणार आहेत. आपले संस्थेमार्फत प्रवेश दिल्यानंतर आपले संस्थेसाठी त्याचे कडून काही महसुल उपलब्ध होईल तो खालील प्रमाणे.

अ) बहि:स्थ विद्यार्थी म्हणून रू.८६०/- मात्र शुल्क आकारून प्रवेश दिल्यास MKCL, पुणे यांचेकडून प्रति विद्यार्थी रू. १००/- प्राप्त होतील तसेच संबंधित संस्थेस प्रति विद्यार्थी रू. १५०/- आकारावे लागेल. याप्रमाणे प्रति विद्यार्थी रू. २५०/- मात्र महसुल जमा होईल.

ब) नियमित विद्यार्थी म्हणून रू. २०१०/- मात्र शुल्कानूसार अन्य संस्थेमार्फत प्रवेश दिल्यास MKCL, पुणे यांचेकडून प्राप्त होणा-या सुमारे रू. १२५०/- पैकी रू. १०००/- मात्र विद्यार्थीना प्रत्यक्ष प्रशिक्षण देणा-या संबंधित संस्थेला MKCL, पुणे यांचेकडून रक्कम प्राप्त झालेनंतर संस्थानमार्फत आदा करता येईल.

आपल्या संस्थेत उपलब्ध असलेल्या बहि:स्थ (Self Study ) जागा रिक्त राहतात या जागांवर वरील विनंती केलेल्या संस्थेतील उमेदवारांना प्रवेश दिल्यास संस्थेसाठी महसुल उपलब्ध होईल. तसेच पुर्ण वेळ (Regular) प्रशिक्षण घेणा-या रिक्त जागांवर प्रवेश दिल्यास यामधूनही संस्थेसाठी महसुल जमा होईल.

तरी पुढील प्रवेश सत्रापासुन बाहेरील गावांतील महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन, लि. पुणे. यांची थेट मान्यता नसलेल्या संस्थेमधील उमेदवारांना आपल्या संस्थेत प्रवेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-प्राचार्य,औ.प्र.संस्था)

**विषय नं.१७. शिक्षण सेवकांच्या सेवा चालु ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५.** सन २००५-०६ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी कला आणि वाणिज्य शाखांचे वर्ग सुरु करण्यात आले. या वर्गाच्या अध्यापनासाठी रुपये ४५/- प्रती तासिका याप्रमाणे तासिका तत्वावर खालील नमूद केलेल्या अ.नं.२ ते ११ या शिक्षणसेवकांच्या नेमणूका दिनांक ३० एप्रिल,२००६ अखेर (शैक्षणिक वर्षा अखेर) करण्यात आल्या असून, मयत शिक्षिका कुंदा सर्जेराव कोते यांचे जागेवर

पूर्णवेळ शिक्षणसेवक म्हणून अ.नं.०१ यांची रुपये ३,०००/- प्रती माह याप्रमाणे मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | शिक्षणसेवकाचे नाव | पदनाम | विभाग | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.अजिंक्यदेव रामचंद्र गायकवाड | पूर्णवेळ शिक्षणसेवक | प्राथमिक | एच.एस.सी.,डी.एड. |
| ०२. | श्री.दिलीप शंकरराव शेळके | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(इंग्रजी),बी.एड. |
| ०३. | श्रीमती कांचन अहिलाजी झावरे | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(मराठी),बी.एड. |
| ०४. | श्री.सुनिल पंढरीनाथ कांडेकर | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(हिन्दी),बी.एड. |
| ०५. | श्रीमती सरिता विष्णू गागरे | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(इतिहास),बी.एड. |
| ०६. | श्रीमती रेश्मा भाऊसाहेब नेहे | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.कॉम. (वाणिज्य),बी.एड. |
| ०७. | श्री.प्रशांत दत्तात्रय गडकरी | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(इंग्रजी),बी.एड. |
| ०८. | श्री.सुनिल जोसेफ गायकवाड | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(अर्थशास्त्र),बी.एड. |
| ०९. | श्रीमती सीमा प्रभाकर जाधव | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(राज्यशास्त्र),बी.एड. |
| १०. | श्री.सुजितकुमार अशोक दळवी | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.कॉम. (वाणिज्य),बी.एड. |
| ११. | श्रीमती वंदना रावसाहेब देशमुख | तासिका तत्वावर शिक्षणसेवक | उच्च माध्यमिक | एम.ए.(भूगोल),बी.एड. |

वरील सर्व शिक्षणसेवकांचे २००५-०६ मधील काम समाधानकारक असून त्यांना सन २००६-०७ मध्ये फेरनेमणूका देता येतील.

**(अ)** वरील तक्त्यातील अ.नं.०१ श्री.अजिंक्यदेव रामचंद्र गायकवाड यांची दरमहा रुपये ३०००/- या मानधनावर सन२००६-०७ पासून तीन वर्षासाठी शिक्षणसेवक (प्राथमिक) या पदावर नेमणूक करता येईल.

**(ब)** सध्याच्या इयत्ता ११ वी कला आणि वाणिज्य या वर्गासह नैसर्गिक वाढीन्नुसार इयत्ता १२ वी कला आणि वाणिज्य या शाखांचे अतिरिक्त वर्ग सन २००६-०७ मध्ये सुरु राहतील. या इयत्ता १२ कला आणि वाणिज्य शाखांच्या वर्गामुळे सध्या उपलब्ध असलेल्या विषयावर कार्यभारापेक्षा सन २००६-०७ मध्ये अधिकचा विषयवार कार्यभार उपलब्ध होईल. सन २००६-०७ मधील इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशान्नुसार कार्यभार निश्चित होईल. विषयवार कार्यभार निश्चित होईपर्यंत वरील तक्त्यातील अ.नं.२ ते ११ यांची सन २००६-०७ यावर्षी उच्च माध्यमिक विभागासाठी शिक्षणसेवक (अर्धवेळ) या पदावर दरमहा रुपये २५००/- या मानधनावर नियुक्ती करता येईल.

**(क)** इयत्ता ११ वी च्या वर्गाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उच्च माध्यमिक विभागाचा विषयवार कार्यभार निश्चित करता येईल. विद्यार्थीसंख्या वाढल्यास इयत्ता ११ वी कला शाखेच्या दोन तुकड्या कराव्या लागतील. ऑगष्ट,२००६ मध्ये विषयवार उपलब्ध असलेल्या कार्यभाराचा आढावा घेऊन ज्या विषयासाठी घड्याळी १८ तास कार्यभार (पूर्णवेळ शिक्षकासाठीचा कार्यभार) उपलब्ध होईल त्या विषयाच्या उच्च माध्यमिक विभागाच्या शिक्षणसेवकांची पूर्णवेळ शिक्षणसेवक म्हणून प्रतिमाह रुपये ५०००/- या मानधनावर नियुक्ती करता येईल.

तरी वरील अ,ब,क प्रमाणे मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.१८. सुलभ इंटर नॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गेनायझेशन यांना सुलभ प्रसाधगृह, शिर्डी येथे एस.टी.डी. सेवा देणेकामी मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७६.** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१८-०७-२००५ रोजीचे सभेतील विषय नं.३२ निर्णय क्र.३६३ चे निर्णया -नुसार सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गेनाझेशन ब्रँच ऑफीस, मुंबई यांना दि.८/०५/२००५ पासून ११ महीने कालावधी करीता सुलभ प्रसाधागृह, शिरडी येथे काऊंटरवर एस.टी.डी.सुविधा चालविणेसाठी परवानगी देण्यात आलेली होती उपरोक्त परवानगी डिपॉझीट फी रक्कम रु.५०००/- मात्र तसेच रुपये १३३१/- मात्र मासिक परवाना फी व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे यानुसार ११

महिने कालावधी करिता लिव्ह अॅड लायसेन्सी तत्वावर एस.टी.डी.बुथ चालविणेस सदरची परवानगी देणेत आली आहे. सदर परवानगी कालावधी संपुष्टात आला असल्याचे त्यांना अलहिदा पत्राने कळविले आहे.

सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनायझेशन यांना संस्थान जागेत एस.टी.डी. चालविणेसाठी देणेत आलेल्या परवान्याची मुदत दि.०७-०४-२००६ रोजी संपल्याने दि.०८-०४-२००६ रोजीपासून पुढील ११ महीने मुदतीकरीता मुदतवाढ मिळावी व संस्थानचे शर्ती, अटी आम्हांस मान्य राहतील अशी त्यांनी (दूरध्वनी वरुन) इकडील कार्यालयास विनंती केलेली आहे. दिनांक ४/०२/२००६ रोजी त्यांचे प्रतिनिधी श्री.अरुणकुमार झा यांनी विंनती केलेली आहे.

तरी त्यांना सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गेनाझेशन रजिस्टर कार्यालय गांधी मैदान, पाटना (बिहार) पिन कोड नं.८०० ००१ रजिस्टर सोसा. रजिस्ट्रेशन अॅक्ट अंडर नं ७३/७०-७१ ब्रँच ऑफीस- ५२/बी, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई-४०० ०७१ यांना पुढील म्हणजेच दि.०८-०४-२००६ रोजीपासून ११ महीने कालावधी करीता सुलभ प्रसाधन गृह शिरडी काऊंटरवर एस.टी.डी. सुविधा चालविणे बाबत मुदतवाढ पुर्वीचेच अटी/शर्तीवर व मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करून म्हणजे मासिक परवाना फी रुपये १४६४/- (अक्षरी रुपये एक हजार चौशष्ट) व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बिल वेगळे आकारुन मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस यांना एस.टी.डी.सुविधेस मुदतवाढ देण्यात येऊ नये, करार संपल्यानंतर त्यांची सेवा बंद करण्यात यावी, असे ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.१९.** **श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००६**

**निर्णय क्र.२७७.** श्रीक्षेत्र शिरडी येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रीगुरुपौर्णिमा उत्सव,सोमवार दिनांक १०.०७.२००६ ते बुधवार,दिनांक १२.०७.२००६ असा तीन दिवस साजरा करण्यात यावा. या उत्सवासाठी प्रामुख्याने खालील गोष्टींची तयारी करावी लागेल, ज्यास मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे इतर अनुषंगिक निर्णय घेण्यात आले.

०१) उत्सव निमंत्रण पत्रिका :- संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्या प्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील. श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,१५,००० नि-मंत्रण पत्रिका तसेच मा.अध्यक्ष, सर्व विश्वस्त व सन्माननीयांना खास पत्रिका पाकीटासह २००० पत्रिका छपाई करुन घेण्यात याव्यात तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज अॅटम) म्हणून वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.

०२) **निमंत्रीत कलाकार कार्यक्रम :-**

अ) निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मिळण्याबाबत आलेली पत्रे मा.अध्यक्ष यांना दाखवून कार्यक्रम निश्चित करण्यात यावेत.

ब) दिनांक १०/०७/२००६ ते दिनांक १२/०७/२००६ या तीन दिवसाकरीता नारदीय पध्दतीने कीर्तन करणाऱ्या किर्तनकाराचा कीर्तन कार्यक्रम ठरविण्यात यावा.

**०३) श्री साईसत्यव्रत(सत्यनारायण)पूजा व अभिषेक पूजा:-** उत्सव काळात दिनांक १०/०७/२००६ ते दिनांक १२/०७/२००६ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा चालू राहतील. मात्र अभिषेक पूजा होणार -नाहीत.

**०४) अखंड पारायण व्यवस्था:-** उत्सव काळात दिनांक १०/०७/२००६ रोजी सकाळी ६.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक ११/०७/२००६ रोजी सकाळी ५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे पाच सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छूक भक्तांची नांवे दि.०९/०७/२००६ रोजी मंदिर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्या काढून (ड्रॉ पध्दतीने) पारायणाकरीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात यावा.

मा.सदस्यांच्या या सर्व कार्यक्रमांतील सहभागाबाबत उचित निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यात आले.

**०५) पालखी व रथ मिरवणूक:-** उत्सवाचे पहिले दिवशी सोमवार दिनांक १०/०७/२००६ रोजी श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक होईल, मंगळवार दिनांक ११/०७/२००६ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल.

**०६) <u>विद्युत रोषणाई:-</u>** समाधी मंदिर, श्री द्वारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई हे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. मात्र ट्रक भाडे व येण्या-जाण्याचा खर्च त्यांना द्यावा लागेल. विद्यूत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात येत आहे. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्यूत रोषणाई करण्यात यावी.

**०७) <u>संरक्षण व्यवस्था:-</u>** उत्सव काळात मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्डस् नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंती करण्यात यावी.

**०८) <u>प्रसाद-भोजन व्यवस्था:-</u>** उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रु.५.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्याचे कुटूंबीय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था केली जाते. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाते. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी , दूध व बिस्कीटे इ.कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात यावे. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री दोन ते तीन ठिकाणी चालू ठेवावी.

श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात सन २००६ मध्ये तीनही दिवसांचे मिष्टान्न पुढीलप्रमाणे ठेवण्यात यावेत

०१. प्रथम दिवस - शिरा ०२. मुख्य दिवस - जिलेबी ०३. सांगता दिन - बुंदी

**०९) <u>लिलाव:-</u>** श्रींना अर्पण केलेली वस्त्रें व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात यावी.

**१०) <u>जादा कंत्राटी कर्मचारी :-</u>** उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. विविध खात्यांकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करण्यात यावेत.

**११) <u>मंडप व कमानी</u> :-** उत्सवात १० मंडप व एक स्टेज टाकणेत यावा.

**१२) <u>सर्व साधारण व्यवस्था</u> :-** नेहमीप्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, इ.व्यवस्था ठेवण्यात येतील. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणा-या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमीप्रमाणे संधी देण्यात यावी. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात यावी. निमंत्रीत कलाकारांची निवास, भोजन, मानधन व्यवस्था करण्यात येईल. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार एम.टी.डी.सी हॉटेल, शिरडी अथवा संस्थानचे निवासात करण्यात यावी.

**१३) <u>पालखी व्यवस्था</u> :-**श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे येथील व इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था लेंडीबाग परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान इमारतीत करण्यात यावी. यावर्षीही ती व्यवस्था मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार करण्यात यावी. पालख्यांचे स्वागताकरीता मा.सदस्यांची एक कमिटी असावी व या कमिटीने पालख्यांचे स्वागत करावे असा प्रस्ताव आहे. त्याचप्रमाणे पायी येणा-या भक्तांची पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी लागेल. आवश्यकतेनुसार नांदगाव-शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टॅंकरने पाणी पुरविणेत यावे.

**१४) <u>भक्तांची निवास व्यवस्था</u> :-** संस्थानचे साईप्रसाद नं.१ व नं.२, साईउद्यान, धर्मशाळा नं.२, भक्तनिवासस्थान या इमारतीमधून करण्यात यावी.

**१५) <u>पाणीपुरवठा</u> :-** पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणेबाबत विनंती करण्यात यावी. नियमीत पाणीपुरवठा राहील, याची व्यवस्था करण्यात यावी.

**१६) <u>कार्यक्रमाची सांगता</u> :-** गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रीत कीर्तनकार करतील.

**१७) <u>खर्चाचे अंदाज पत्रक</u> :-**श्री गुरुपौर्णिमा सन २००५ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०,११,०००.०० (अक्षरी रु. वीस लाख अकरा हजार मात्र) मंजूरी देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५/कामगार अधिकारी/अधिक्षक, मंदिर विभाग)

**विषय नं.२०.** **श्री.जयंत विश्वनाथ वझे,वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा यांचे खातेचौकशी बाबत.**

**निर्णय क्र.२७८.** श्री.जयंत विश्वनाथ वझे,वरिष्ठ लेखापाल (सद्या निलंबीत) हे दि.०६-१०-१९८६ पासून संस्थान सेवेत आहेत. श्री.वझे हे दि.१५-०३-२००३ पासून संस्थानचे लेखाशाखेत वरिष्ठ लेखापाल म्हणून कार्यरत आहेत. श्री.वझे यांचेकडून सेवेत असतांना खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

संस्थानच्या दिवसभर येणा-या रोख रक्कमेपैकी काही रक्कम अखेरची शिल्लक म्हणून ठेवून उर्वरीत सर्व रोख रक्कमेचा भरणा दिवसा अखेर विविध बँकामध्ये रोजचे रोज करण्याची जबाबदारी श्री.ल.स.चव्हाण यांची आहे. तसेच त्यांचे मदतीला सहाय्यक म्हणून कंत्राटी कर्मचारी श्री.राजेंद्र किसन चौधरी हे काम करीत होते.रोजचे रोज भरणा करण्यात आलेल्या रोख रक्कमेबाबत व इतर आर्थिक व्यवहारांबाबत महिना अखेरीस बँकेकडून खाते उतारा मागविणेत येतो.सदरील खाते उतारा प्राप्त झ ालेनंतर त्यांची पडताळणी बँक खतावणीतील खात्यांबरोबर केली जाते.बँक खात्यांचा ताळमेळ घालण्याचे कामकाज श्री.जे.व्ही.वझे,वरिष्ठ लेखापाल करीत असतात.तसेच दैनंदिन येणा-या रोख रक्कमेचा भरणा दिवसाअखेर विविध बँकामध्ये रोजचे रोज होत आहे किंवा नाही.तसेच दैनंदिन इतर आर्थिक व्यवहारांच्या नोंदी रोजच्या रोज होतात किंवा नाही.?रोजकीर्द न्नुसार शिल्लक रक्कम व प्रत्यक्ष शिल्लक रक्कमेचा ताळमेळ बसतो किंवा नाही.? याबाबतची दररोज पडताळणी/तपासणीचे कामकाज श्री.जे.व्ही.वझे यांना नेमून दिलेले आहेत. असे असतांना लेखाशाखेमध्ये खालीलप्रमाणे अपहार/अफरातफरीची घटना घडलेली आहे.

**०१** दि.१०-१०-२००५ रोजी रोख रक्कमेत एकूण रु.१,००,०००/- मात्रचा फरक (रोजकिर्दन्नुसार शिल्लक रक्कमेपेक्षा प्रत्यक्ष शिल्लक रक्कम कमी ) दिसून आला. तद्नंतर दि.१५-१०-२००५ रोजी रोख रक्कमेत आणखी रु.५०,०००/- मात्रचा फरक दिसून आला, दि.१९-१०-२००५ रोजी पुन्हा रोख रक्कमेत आणखी रु.३०,०००/- मात्रचा फरक दिसून आला. म्हणजेच रोजकिर्दन्नुसार शिल्लक रक्कमेपक्षा प्रत्यक्ष शिल्लक रक्कम एकूण रु. १,८०,०००/- मात्र इतकी रक्कम कमी असल्याचे तपासणीअंती निदर्शनास आले.रोजकिर्दप्रमाणे सर्व व्हाउचर्स व जमा रक्कमेची बारकाईने पुन्हा एकदा तपासणी केली असता त्यावरुन कागदोपत्री तफावत नसल्याचे दिसून आले. तथापी, सदर तफावत ही रोख रक्कमेची असल्याचे दि.२१/११/२००५ रोजी दिसून आले. त्यानंतर श्री.ल.स.चव्हाण, मुख्य रोखपाल व श्री.राजेंद्र किसन चौधरी, कंत्राटी कामगार यांना समक्ष बोलावून घेऊन शिल्लक रक्कमेमध्ये उपरोक्तप्रमाणे कमी असलेली रक्कम रु.१,८०,०००/- मात्र त्वरीत भरण्याचे श्री.प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी एकूण रक्कम रु.१,८०,०००/- पैकी रक्कम रु.९५,०००/- दि.२२-११-२००५ रोजी व रु.८५,०००/- दि.२३-११-२००५ रोजी जमा केली आहे. म्हणजेच श्री.चव्हाण व श्री.रा.कि.चौधरी यांनी कागदोपत्री तफावत नसल्याचे दर्शविले. तथापी, रोजकिर्दन्नुसार शिल्लक रक्कमेपेक्षा प्रत्यक्ष शिल्लक रोख रक्कम एकूण रु.१,८०,०००/- मात्र इतकी रक्कम कमी असल्याचे तपासणीअंती निदर्शनास आले. यावरुन श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोखपाल यांनी कंत्राटी सहाय्यक कर्मचारी श्री.रा.कि.चौधरी यांचे मदतीने, संगनमताने रु.१,८०,०००/- मात्र रक्कमेचा अपहार करुन संस्थानची फसवणूक करुन अप्रामाणिकपणा केलेला आहे.

**०२** तसेच दि.२१-११-२००५ रोजीचे आंध्र बँक खाते नं.१ चा ताळमेळ दि.०६-१२-२००५ रोजी घालत असतांना असे निदर्शनास आले आहे की, सदर बँकेत एकूण रक्कम-रु.३,२७,०००/- मात्र (रु.१,९७,०००/- व रु.१,३०,०००/-) भरणा केला असल्याबाबत रोजकिर्दमध्ये नोंद दिसत आहे. परंतू आंध्रबँकेने प्रत्यक्षात रु.१,३०,०००/ मात्र रक्कम जमा असल्याचे दाखविलेले असून रु. १,९७,०००/- रक्कम मात्र कोठेही जमा दाखविलेली नाही. म्हणजेच संस्थान खाते व आंध्रबँक खाते यांचेमध्ये रु.१,९७,०००/- मात्र रक्कमेचा फरक/ तफावत असल्याचे तपासणीअंती निदर्शनास आले. याबाबत श्री.जे.व्ही.वझे, वरिष्ठ लेखापाल यांनी आंध्रबँकेकडे विचारणा केली असता दि.०६-१२-२००५ रोजी फक्त रु.१,३०,०००/- मात्र रक्कमेचा प्रत्यक्ष भरणा केलेला असलेबाबत बँकेच्या प्रतिनिधींनी सांगितले.

तद्नंतर त्याची खात्री करणेसाठी श्री.वझे यांनी व्हाउचरला रोख भरणा केला असलेबाबतची बँकेची स्लिप तपासणीसाठी पाहीली असता, व्हाउचर तपासणीचे वेळी जोडलेली स्लिप नंतर गहाळ झ ाल्याचे त्यांना आढळून आले. सखोल तपासणीअंती उपरोक्तप्रमाणे रु.१,९७,०००/- रक्कमेचा भरणा श्री.चव्हाण यांनी श्री.रा.कि.चौधरी यांचे मदतीने, संगनमताने केलेला नसल्याचे दि.०६-१२-२००५ रोजी उशिराने/विलंबाने तपासणीअंती निदर्शनास आले आहे. त्यानंतर श्री.ल.स.चव्हाण व श्री.रा.कि.चौधरी यांना समक्ष बोलावून घेऊन तफावत असलेल्या रु.१,९७,०००/- मात्र रक्कमेचा भरणा त्वरीत करणेबाबत श्री.प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले. त्याप्रमाणे श्री.ल.स.चव्हाण व श्री.रा.कि.चौधरी यांनी दि.०७-१२-२००५ रोजी रक्कम रु.१,४५,०००/- व दि.०८-१२-२००५ रोजी उर्वरीत रक्कम रु.५२,०००/- अशा एकूण रु.१,९७,०००/- मात्र रक्कमेचा भरणा केलेला आहे यावरुन श्री.चव्हाण यांनी श्री.रा.कि.चौधरी यांचे मदतीने, संगनमताने आंध्रबँक खाते नं.१ मध्ये रु.१,९७,०००/- रक्कमेचा भरणा केलेला असल्याचे खोटे दाखवून तशी बनावट व खोटी स्लिप दाखल करुन तसेच व्हाउचर सोबत जोडलेली बनावट व खोटी स्लिप गहाळ करुन, संस्थानची फसवणूक करुन संस्थानशी अप्रामाणिकपणा केलेला आहे.

श्री.वझे यांनी दैनंदिन येणा-या रोख रक्कमेचा भरणा दिवसाअखेर विविध बँकामध्ये रोजचे रोज होत आहे किंवा नाही.तसेच दैनंदिन इतर आर्थिक व्यवहारांच्या नोंदी रोजच्या रोज होतात किंवा नाही.तसेच प्रत्यक्ष शिल्लक रक्कमेचा रोजकिर्दनुसार ताळमेळ बसतो किंवा नाही याची तपासणी दि.१०/१०/२००५ ते दि.२०/११/२००५ या कालावधीत दररोज केलेली नसल्यामुळे सदरची घटना घडल्याचे दि.२१/११/२००५ रोजी व दि.०६/१२/२००५ रोजी उशिराने/विलंबाने निदर्शनास आली.श्री.वझे यांनी रोजचे रोज पडताळणी केली असती तर सदरची घटना ही दि.११/१०/२००५ रोजीच प्रथमतः निदर्शनास आली असती.त्यानंतर दि.१५/१०/२००५,दि.१९/१०/२००५ व दि.२१/११/२००५ रोजीच्या अफरातफरीच्या घटना घडल्या नसत्या.तसेच सदरच्या घटनांबाबत वर्तमान पत्रात बातम्या प्रसिध्द झाल्यामुळे संस्थानची व संस्थान प्रशासनाची जी बदनामी झाली आहे ती बदनामी झाली नसती.

**०३** सदर घटनेबाबत दि.११-१२-२००५, दि.१२-१२-२००५,दि.१४-१२-२००५,दि.१५-१२-२००५ व दि.१६-१२-२००५ रोजी विविध दैनिक वर्तमान पत्रातून बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. त्यामुळे संस्थान व संस्थान प्रशासनाची बदनामी होऊन संस्थानचे नांवलौकीकास व इभ्रतीस बाधा निर्माण झालेली आहे. तसेच सदर घटनेने साईभक्तांमध्ये संस्थान कर्मचा-यांबाबत संभ्रम निर्माण होऊन गैरसमज झालेला आहे.

श्री.जे.व्ही.वझे,वरिष्ठ लेखापाल यांचे सदरचे कृत्य हे दि इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑडर्स) ॲक्ट १९४६ च्या कलम नं.२२(ए) प्रमाणे वरिष्ठांच्या कोणत्याही कायदेशीर आणि वाजवी हुकुमांच्या बाबतीत, दुस-याच्या जोडीने असो की नसो, जाणून बुजून उद्दामपणा करणे किंवा त्याचे पालन न करणे, २२(एल) प्रमाणे आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनालाबाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे, २२ (एम) प्रमाणे कामाची नेहमी, नेहमी हेळसांड करणे किंवा कमालीची किंवा नेहमी, नेहमी हयगय करणे या गैरशिस्त वर्तनात मोडते.

उपरोक्तप्रमाणे रु.१,८०,०००/- व रु.१,९७,०००/- रक्कमेच्या अपहार प्रकरणा संदर्भात श्री.राजेंद्र किसन चौधरी यांचे विरुध्द शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे संस्थानचे वतीने दि.२०-१२-२००५ रोजी एफ.आय.आर. नं.१०८/२००५ अन्वये फिर्याद नोंदविण्यात आली आहे.

तसेच सदरचे घटना/गैरवर्तना संदर्भात श्री.जे.व्ही.वझे यांना खाते चौकशीचे कामकाज पुर्णहोऊन निर्णय होईपर्यंत जा.नं.एसएसएस /वशी-७ए/३०१०/२००५ दि.०८-१२-२००५ अन्वये सेवानिलंबीत करणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे श्री.जे.व्ही.वझे यांना लेखाशाखेतील सदर अपहार/गैरशिस्त वर्तन प्रकरणाबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३०९०/२००५ दि.१६-१२-२००५ अन्वये आरोपपत्र देण्यात आलेले आहे.

सदरचे आरोपपत्राची खातेचौकशी ॲड.श्री.आर.जी.चिने, कोपरगाव,चौकशी अधिकारी यांनी पुर्ण करुन त्यांचा दि.०४-०४-२००६ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

कसुरदार यांनी लेखी जबाब निशानी क्रमांक ०१ ला दिलेला आहे. परंतु त्या जबाबावरुन त्यांना दिलेल्या कामकाजामध्ये त्यांनी हलगर्जीपणा केल्याचेच दिसून येते.झालेल्या पुराव्यावरुन व कागदपत्रावरुन श्री.वझे यांचेवरील आरोप सिध्द झाले असल्याने ते सदर कायद्याचे ऑर्डर नं.२२ (ए),व २२ (एम) नुसार दोषी आहेत.ते ऑर्डर नं.२२ (एल) खाली श्री.वझे यांना मुक्त करणेत आले आहे.

**- निष्कर्ष (आदेश) -**

" श्री.जयंत विश्वनाथ वझे,वरिष्ठ लेखापाल हे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टँण्डींग ऑर्डर्स) कलम २२ (ए) व २२ (एम) खाली दोषी आहेत.

श्री.जे.व्ही.वझे यांचा माहे ऑक्टोबर २००२ कालावधीचा अटेंन्डट पंचिग कार्ड डाटा रिपोर्ट तपासला असता ते डयुटीच्या नेमून दिलेल्या विहीत वेळत कामावर न येता एकूण-२० वेळा कामावर उशिराने आले आहेत.सदरच्या गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.वझे यांना तोंडी ताकीद देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे श्री.जे.व्ही.वझे यांना यापुर्वी एक वेळेस गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा झालेली आहे.

उपरोक्तप्रमाणे गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.जे.व्ही.वझे यांना देणेत आलेल्या आरोपपत्रातील क्रमांक २२ (ए) व २२ (एम) प्रमाणे आरोप सिध्द झालेले असल्याने व त्यात श्री.जे.व्ही.वझे हे दोषी असल्याचा निष्कर्ष खातेचौकशी अधिकारी यांनी त्यांचे दि.०४-०४-२००६ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालात काढलेला आहे .

दि इंडस्ट्रियल एम्पलॉयएमेंट ( स्टॅडींग ऑर्डर्स ) रुल्स १९४६ चे कलम नं.२३ (१) नुसार गैरवर्तनाबाबत दोषी असलेल्या कामगारास, कर्मचा-यास खालीलप्रमाणे शिक्षा सुचित केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन श्री.जे.व्ही.वझे,वरिष्ठ लेखापाल,लेखाशाखा विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत खालील शिक्षेपैकी एक शिक्षा देता येईल.

**अ)** ताकिद द्यावी किंवा ठपका द्यावा.

**ब)** पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ याच्या तरतुदींच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा. (एक दिवसाचे मुळ वेतनाइतका )

**क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशान्वये सस्पेंड करावे.

**ड)** नोटीशी शिवाय बडतर्फ करावे.

श्री.जे.व्ही.वझे, वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा विभाग यांना नियमानुसार दि.०४-०४-२००६ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाची प्रत पाठवावी लागेल. तसेच प्रस्तावीत केली जाणारी शिक्षा त्यांना कां करु नये ? अशी नोटीस देऊन त्यांचा लेखी खुलासा मागवावा लागेल.

वरील शिक्षेपैकी अ.नं.(अ),(ब) किंवा (क) या मधील एक शिक्षा श्री.जे.व्ही.वझे यांना देता येईल किंवा उपरोक्त शिक्षेपैकी अ.नं." ड " मधील शिक्षा देणेची असल्यास संस्थानच्या वतीने श्री.जे.व्ही.वझे यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद, मा.कामगार न्यायालय, मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर तसेच मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, राहाता व वरिष्ठ स्तर,कोपरगाव येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिरडी), अधिनियम , २००४ (२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४) याच्या कलम १६ मध्ये " राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे (कर्मचा-याचे ) अहीत होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही. किंवा अशा व्यक्तीला (कर्मचा-याला )सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही " अशी तरतुद आहे. सदर तरतुदीस अनुसरुन श्री.जे.व्ही.वझे यांना "ड" प्रमाणे शिक्षा देणेची असल्यास श्री.वझे यांचे " बडतर्फी " संदर्भात मान्यतेसाठी राज्यशासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल.

श्री.जे.व्ही.वझे,वरिष्ठ लेखापाल यांना गैरशिस्त वर्तनाबाबत दिनांक- दि.०४/०४/२००६ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालास अनुसरुन उपरोक्त चार शिक्षेपैकी कोणती शिक्षा करावयाची याबाबत संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील,ॲडव्होकेट,अहमदनगर यांचा दि.२०/०४/२००६ रोजी कायदेशीर अभिप्राय घेणेत आला आहे त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"Issue second Show cause notice inviting his explaination on findings of Enquiry Officer and proposed punishment of dismissal"

सबब, श्री.जे.व्ही.वझे,वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त शिक्षेपैकी कोणती शिक्षा करावयाची याबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.जे.व्ही.वझे, वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा विभाग, यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून संस्थान सेवेत पूर्ववत कामावर घेण्यात यावे. मात्र त्यांनी केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना शिक्षा म्हणून उपरोक्त **"ब"** मध्ये सुचविलेप्रमाणे-"पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ याच्या तरतुदींच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार एक दिवसाचे मुळ वेतनाइतका दंड करणेत यावा." त्यांचा खातेचौकशी पूर्ण होऊन निर्णय होईपर्यंतचा सेवा निलंबन कालावधी निलंबन म्हणून कायम करण्यात यावा, असें ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.२१.** **श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण,मुख्य रोखपाल, लेखाशाखा यांचे खातेचौकशी बाबत.**

**निर्णय क्र.२७९.** श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण, मुख्यरोखपाल (सद्या निलंबीत) हे दि.०२-०७-१९८४ पासून संस्थान सेवेत आहेत. श्री.चव्हाण हे दि.०४-११-२००४ पासून संस्थानचे लेखाशाखेत मुख्यरोखपाल म्हणून कार्यरत आहेत. श्री.चव्हाण यांचेक्डून सेवेत असतांना खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

संस्थानच्या दिवसभर येणा-या रोख रक्कमेपैकी काही रक्कम अखेरची शिल्लक म्हणून ठेवून उर्वरीत सर्व रोख रक्कमेचा भरणा दिवसाअखेर विविध बँकामध्ये रोजचे रोज करण्याची जबाबदारी श्री.ल.स.चव्हाण यांची आहे. तसेच त्यांचे मदतीला सहाय्यक म्हणून कंत्राटी कर्मचारी श्री.राजेंद्र किसन चौधरी हे काम करीत होते. असे असतांना लेखाशाखेमध्ये खालीलप्रमाणे अपहार/ अफरातफरीची घटना घडलेली आहे.

१. दि.१०-१०-२००५ रोजी रोख रक्कमेत एकूण रु.१,००,०००/- मात्रचा फरक (रोजकिर्दन्नुसार शिल्लक रक्कमेपेक्षा प्रत्यक्ष शिल्लक रक्कम कमी ) दिसून आला. तद्नंतर दि.१५-१०-२००५ रोजी रोख रक्कमेत आणखी रु.५०,०००/- मात्रचा फरक दिसून आला, दि.१९-१०-२००५ रोजी पुन्हा रोख रक्कमेत आणखी रु.३०,०००/- मात्रचा फरक दिसून आला. म्हणजेच रोजकिर्दन्नुसार शिल्लक रक्कमेपक्षा प्रत्यक्ष शिल्लक रक्कम एकूण रु. १,८०,०००/- मात्र इतकी रक्कम कमी असल्याचे

तपासणीअंती निदर्शनास आले.रोजकिर्दप्रमाणे सर्व व्हाउचर्स व जमा रक्कमेची बारकाईने पुन्हा एकदा तपासणी केली असता त्यावरुन कागदोपत्री तफावत नसल्याचे दिसून आले. तथापी, सदर तफावत ही रोख रक्कमेतील असल्याचे दिसून आले. त्यानंतर श्री.ल.स.चव्हाण, मुख्य रोखपाल व श्री.राजेंद्र किसन चौधरी, कंत्राटी कामगार यांना समक्ष बोलावून घेऊन शिल्लक रक्कमेमध्ये उपरोक्तप्रमाणे कमी असलेली रक्कम रु.१,८०,०००/- मात्र त्वरीत भरण्याचे श्री.प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी एकूण रक्कम रु.१,८०,०००/- पैकी रक्कम रु.९५,०००/- दि.२२-११-२००५ रोजी व रु.८५,०००/- दि.२३-११-२००५ रोजी जमा केली आहे. म्हणजेच श्री.चव्हाण व श्री.रा.कि.चौधरी यांनी कागदोपत्री तफावत नसल्याचे दर्शविले. तथापी, रोजकिर्दन्नुसार शिल्लक रक्कमेपेक्षा प्रत्यक्ष शिल्लक रोख रक्कम एकूण रु.१,८०,०००/- मात्र इतकी रक्कम कमी असल्याचे तपासणीअंती निदर्शनास आले. यावरुन श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोखपाल यांनी कंत्राटी सहाय्यक कर्मचारी श्री.रा.कि.चौधरी यांचे मदतीने, संगनमताने रु.१,८०,०००/- मात्र रक्कमेचा अपहार करुन संस्थानची फसवणूक करुन अप्रामाणिकपणा केलेला आहे.

२. तसेच दि.२१-११-२००५ रोजीचे आंध्र बँक खाते नं.१ चा ताळमेळ दि.०६-१२-२००५ रोजी घालत असतांना असे निदर्शनास आले आहे की, सदर बँकेत एकूण रक्कम रु.३,२७,०००/- मात्र (रु.१,९७,०००/- व रु.१,३०,०००/-) भरणा केला असल्याबाबत रोजकिर्दमध्ये नोंद दिसत आहे. परंतू आंध्रबँकेने प्रत्यक्षात रु.१,३०,०००/ मात्र रक्कम जमा असल्याचे दाखविलेले असून रु. १,९७,०००/- रक्कम मात्र कोठेही जमा दाखविलेली नाही. म्हणजेच संस्थान खाते व आंध्रबँक खाते यांचेमध्ये रु.१,९७,०००/- मात्र रक्कमेचा फरक/ तफावत असल्याचे तपासणीअंती निदर्शनास आले. याबाबत श्री.जे.व्ही.वझे, वरिष्ठ लेखापाल यांनी आंध्रबँकेकडे विचारणा केली असता दि.०६-१२-२००५ रोजी फक्त रु.१,३०,०००/- मात्र रक्कमेचा प्रत्यक्ष भरणा केलेला असलेबाबत बँकेच्या प्रतिनिधींनी सांगितले.

तद्नंतर त्याची खात्री करणेसाठी श्री.वझे यांनी व्हाउचरला रोख भरणा केला असलेबाबतची बँकेची स्लिप तपासणीसाठी पाहीली असता, व्हाउचर तपासणीचे वेळी जोडलेली स्लिप नंतर गहाळ झाल्याचे त्यांना आढळून आले. सखोल तपासणीअंती उपरोक्तप्रमाणे रु.१,९७,०००/- रक्कमेचा भरणा श्री.चव्हाण यांनी श्री.रा.कि.चौधरी यांचे मदतीने, संगनमताने केलेला नसल्याचे दि.०६-१२-२००५ रोजी तपासणीअंती निदर्शनास आले आहे. त्यानंतर श्री.ल.स.चव्हाण व श्री.रा.कि.चौधरी यांना समक्ष बोलावून घेऊन तफावत असलेल्या रु.१,९७,०००/- मात्र रक्कमेचा भरणा त्वरीत करणेबाबत श्री.प्र.प्र.देशपांडे, प्रशासकीय अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले. त्याप्रमाणे श्री.ल.स.चव्हाण व श्री.रा.कि.चौधरी यांनी दि.०७-१२-२००५ रोजी रक्कम रु.१,४५,०००/- व दि.०८-१२-२००५ रोजी उर्वरीत रक्कम रु.५२,०००/- अशा एकूण रु.१,९७,०००/- मात्र रक्कमेचा भरणा केलेला आहे यावरुन श्री.चव्हाण यांनी श्री.रा.कि.चौधरी यांचे मदतीने, संगनमताने आंध्रबँक खाते नं.१ मध्ये रु.१,९७,०००/- रक्कमेचा भरणा केलेला असल्याचे खोटे दाखवून तशी बनावट व खोटी स्लिप दाखल करुन तसेच व्हाउचर सोबत जोडलेली बनावट व खोटी स्लिप गहाळ करुन, संस्थानची फसवणूक करुन,अप्रामाणिकपणा केलेला आहे.

३. सदर घटनेवरुन श्री.ल.स.चव्हाण मुख्यरोखपाल यांनी त्यांची जबाबदारी अत्यंत दुर्लक्षीतपणे पार पाडल्याचे दिसून येते. म्हणजेच श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोपाल यांनी कामांत जाणून बुजून वेळकाढूपणा, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केलेला आहे. तसेच श्री.चव्हाण हे कंत्राटी कर्मचारी श्री.चौधरी यांचेवर पुर्णपणे अवलंबून राहील्याने श्री.चौधरी यांनी संधीचा गैरफायदा घेतल्याचे दिसते.

४. सदर घटनेबाबत दि.११-१२-२००५, दि.१२-१२-२००५,दि.१४-१२-२००५,दि.१५-१२-२००५ व दि.१६-१२-२००५ रोजी विविध दैनिक वर्तमान पत्रातून बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. त्यामुळे संस्थान व संस्थान प्रशासनाची बदनामी होऊन संस्थानचे नांवलौकीकास व इभ्रतीस बाधा निर्माण झालेली आहे. तसेच सदर घटनेने साईभक्तांमध्ये संस्थान कर्मचा-यांबाबत संभ्रम निर्माण होऊन गैरसमज झालेला आहे.

श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोखपाल यांचे सदरचे कृत्य हे दि इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑडर्स ) ॲक्ट १९४६ च्या कलम नं.२२(ए) प्रमाणे वरिष्ठांच्या कोणत्याही कायदेशीर आणि वाजवी हुकुमांच्या बाबतीत, दुस-याच्या जोडीने असो की नसो, जाणून बुजून उद्दामपणा करणे किंवा त्याचे पालन न करणे, २२ (डी) प्रमाणे मालाकाचा धंदा किंवा मालमत्ता यांच्या बाबतीत चोरी किंवा फसवणूक किं वा अप्रामाणिकपणा करणे, २२(एल) )प्रमाणे आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनालाबाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे, २२ (एम) प्रमाणे कामाची नेहमी, नेहमी हेळसांड करणे किंवा कमालीची किंवा नेहमी, नेहमी हयगय करणे या गैरशिस्त वर्तनात मोडते.

उपरोक्तप्रमाणे रु.१,८०,०००/- व रु.१,९७,०००/- रक्कमेच्या अपहार प्रकरणा संदर्भात श्री.राजेंद्र किसन चौधरी यांचे विरुध्द शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे संस्थानचे वतीने दि.२०-१२-२००५ रोजी एफ.आय.आर. नं.१०८/२००५ अन्वये फिर्याद नोंदविण्यात आली आहे.

तसेच सदरचे घटना/गैरवर्तना संदर्भात श्री.ल.स.चव्हाण यांना खातेचौकशीचे कामकाज पुर्णहोऊन निर्णय होईपर्यंत जा.नं.एसएसएस /वशी-७ए/३००९/२००५ दि.०८-१२-२००५ अन्वये सेवानिलंबीत करणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे श्री.ल.स.चव्हाण यांना लेखाशाखेतील सदर अपहार/गैरशिस्त वर्तन प्रकरणाबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३०९२ / २००५ दि.१६-१२-२००५ अन्वये आरोपपत्र देण्यात आलेले आहे.

सदरचे आरोपपत्राची खातेचौकशी ॲड.श्री.आर.जी.चिने, कोपरगाव, चौकशी अधिकारी यांनी पुर्ण करुन त्यांचा दि.०४-०४-२००६ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

सुपरवायझरी कॅटेगरीतील कसुरदार यांचे विरुध्द आरोप पुराव्याने सिध्द झालेले असल्याने तो दोषी आहे. सदर श्री साईबाबा संस्थान यांनी योग्य तो निर्णय जरुर घ्यावा व अशी बेजबाबदार माणसे आर्थिक विभागात राहणार नाहीत याची काळजी घ्यावी. श्री.चव्हाण यांनी दिलेला अंतीम जबाब विश्वासार्ह नाही.

**- <u>निकाल</u> -**

" श्री.ल.स.चव्हाण,मुख्य रोखपाल,श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचेवरील आरोप सिध्द झाल्याने ते दोषी आहेत.

श्री.ल.स.चव्हाण हे विद्युत विभागात असतांना यापुर्वी दि.१७-०३-१९९२ रोजी रंगीत दुरदर्शनसंच गहाळ झालेमुळे त्यांचे पगारातून रु.३००/- मात्र वसुल करण्यात आले. तसेच श्री.चव्हाण यांना मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०८-०२-१९९८ रोजी मिटींगचे दिवशी हजर रहाणेबाबत सांगितले असता त्यांनी वरिष्ठांना उध्दट उत्तरे दिली व कामावर गैरहजर राहीले. या गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना लेखी समज देणेत आली. अशाप्रकारे श्री.ल.स.चव्हाण यांना यापुर्वी दोन वेळेस गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा झालेल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.ल.स.चव्हाण यांना देणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले असल्याने व त्यात श्री.ल.स.चव्हाण हे दोषी असल्याचा निकाल खातेचौकशी अधिकारी यांनी त्यांचे दि.०४-०४-२००६ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालात दिलेला आहे .

दि इंडस्ट्रियल एम्पलॉयएमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स १९४६ चे कलम नं.२३ (१) न्नुसार गैरवर्तनाबाबत दोषी असलेल्या कामगारास,कर्मचाऱ्यास खालीलप्रमाणे शिक्षा सुचित केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोखपाल, लेखाशाखा विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत खालील शिक्षेपैकी एक शिक्षा देता येईल.

**अ)** ताकिद द्यावी किंवा ठपका द्यावा.

**ब)** पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ याच्या तरतुदींच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा. (एक दिवसाचे मुळ वेतनाइतका )

**क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशान्वये सस्पेंड करावे.

**ड)** नोटीशी शिवाय बडतर्फ करावे.

श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोखपाल, लेखाशाखा विभाग यांना नियमान्नुसार दि.०४-०४-२००६ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाची प्रत पाठवावी लागेल. तसेच प्रस्तावीत केली जाणारी शिक्षा त्यांना कां करु नये ? अशी नोटीस देऊन त्यांचा लेखी खुलासा मागवावा लागेल.

वरील शिक्षेपैकी अ.नं.(अ),(ब) किंवा (क) या मधील एक शिक्षा श्री.ल.स.चव्हाण यांना देता येईल किंवा उपरोक्त शिक्षेपैकी अ.नं." ड " मधील शिक्षा देणेची असल्यास संस्थानच्या वतीने श्री.ल.स.चव्हाण यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद, मा.कामगार न्यायालय, मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर तसेच मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,राहाता व वरिष्ठ स्तर, कोपरगाव येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिरडी), अधिनियम, २००४ (२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४) याच्या कलम १६ मध्ये" राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे (कर्मचा-याचे ) अहीत होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही. किंवा अशा व्यक्तीला (कर्मचा-याला) सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही " अशी तरतुद आहे. सदर

तरतुदीस अनुसरुन श्री.ल.स.चव्हाण यांना "ड" प्रमाणे शिक्षा देणेची असल्यास श्री.चव्हाण यांचे "बडतर्फी " संदर्भात मान्यतेसाठी राज्यशासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल.

श्री.ल.स.चव्हाण,मुख्य रोखपाल यांना गैरशिस्त वर्तनाबाबत दिनांक- ०४/०४/२००६ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालास अनुसरुन उपरोक्त चार शिक्षेपैकी कोणती शिक्षा करावयाची याबाबत संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील,ॲडव्होकेट,अहमदनगर यांचा दि.२०/०४/२००६ रोजी कायदेशीर अभिप्राय घेणेत आला आहे त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

" Kindly issue second Show cause notice to the delinquent employee inviting his explaination to the charges proved and as to why his services should not be terminated ?

सबब,श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोखपाल, लेखाशाखा विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त शिक्षेपैकी कोणती शिक्षा करावयाची याबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ल.स.चव्हाण, मुख्यरोखपाल, लेखाशाखा विभाग, यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून संस्थान सेवेत पूर्ववत कामावर घेण्यात यावे. मात्र त्यांनी केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना शिक्षा म्हणून उपरोक्त **"ब"** मध्ये सुचविलेप्रमाणे-"पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ याच्या तरतुदींच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार एक दिवसाचे मुळ वेतनाइतका दंड करणेत यावा."

त्यांचा खातेचौकशी पूर्ण होऊन निर्णय होईपर्यंतचा सेवा निलंबन कालावधी निलंबन म्हणून कायम करण्यात यावा तसेच श्री चव्हाण यांची लेखाशाखेतून संस्थानचे इतर विभागात बदली करण्यात यावी, असें ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.२२.** **संस्थान सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८०.** श्री विलास भिमाजी धुळसैंदर हे संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे ,मदतनीस या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.११/०३/२००६ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| १. | दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव | :-कै.विलास भिमाजी धुळसैंदर |
| २. | मृत्युचे वेळी हुद्दा व विभाग | :- मदतनीस,श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग |
| ३. | संस्थानमधील सेवेचा कालावधी | :- दि.०६/०३/१९८९ ते दि.१०/०३/२००६<br>एकूण सेवा १७ वर्षे |
| ४. | मृत्यु दिनांक | :- ११/०३/२००६ |

दिवंगत धुळसैंदर यांच्या पत्नी नामे श्रीमती विमल विलास धुळसैंदर यांनी संस्थानमध्ये पतीचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| ०१. अर्जदाराचे नांव | :- श्रीमती विमल विलास धुळसैंदर |
| ०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते | :- पत्नी |
| ०३. जन्मतारीख व वय | :- दि.०१/०६/१९७५ (वय वर्षे ३० वर्षे ०९ महिने) |
| ०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता | :- अशिक्षित, |

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्रीमती विमल विलास धुळसैंदर यांनी त्यांना अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणेबाबत विनंती करुन तसा अर्ज सादर केलेला आहे.

श्रीमती विमल धुळसैंदर यांनी त्यांचे माहेरचे नांव विमल हौसिराम कांदळकर व लग्नानंतर सासरचे नांव विमल विलास धुळसैंदर ह्या दोन्ही नावाची व्यक्ती मी एकच असल्याबाबतचे मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी, राहाता यांचे समोर दि.२९/०३/२००६ रोजी करुन दिलेले प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

तरी दिवंगत विलास भिमाजी धुळसैंदर यांची पत्नी नामे श्रीमती विमल विलास धुळसैंदर यांना, शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्या पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.२३.** **श्रीसाईनाथ हॉस्पिटल कर्मचारी नविन (७२६) कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध व आर्थिक भार.**

**निर्णय क्र.२८१.** मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान शिर्डी मार्फत सर्व अद्ययावत सुविधांनीयुक्त असे २०० खाटांचे रुग्णालयासाठी आवश्यक असलेला मेडीकल / पॅरामेडीकल अशा एकूण ५४२ कर्मचाऱ्यांचा सेवक आकृतीबंध मान्यतेसाठी उपरोक्त जा.नं.एसएसएस/वशी-०१/८८०३/२००५ दि.१६/०८/२००५ मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य शासन यांचेकडे सादर करण्यात आलेला होता.

त्यानंतर,मा.सचिव विधी व न्याय विभाग यांचे आदेशानुसार सदरचा सेवक आकृतीबंध मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडून प्रमाणीत करुन घेऊन जा.नं.एसएसएस/वशी-०१/११००६/२००५ दि.०३/१०/२००५ अन्वये मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पुन्हा पाठविण्यात आलेला होता. सदर आकृतीबंधासंबंधी दि.२४/०१/२००६ रोजी मा.संचालक आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र शासन) यांचे कक्षात सभा आयोजीत करण्यात आलेली होती.त्यावेळी मा.डॉ.पी.एल.तिवारी अध्यक्ष रुग्णालय समिती तथा मा.सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी हे हजर होते.त्यासभेत मा.संचालक आरोग्य सेवा यांनी एकूण ७४४ वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी पदांचे आकृतीबंधास मान्यता दिली व प्रस्ताव मा.सचिव,आरोग्य विभाग मंत्रालय यांचेकडे पाठविला.मा.सचिव आरोग्य विभाग यांनी सदरचे प्रस्तावास मान्यता देऊन तो प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर केला.

सदरचे आकृतीबंधातील पदांचे मराठीत नामाभिधान करुन मासिक / वार्षिक वित्तीय भार याबाबतचा तपशील तात्काळ शासनास सादर करण्यात यावा असे विधी व न्याय विभागाने त्यांचे दि.१०/०४/२००६ चे पत्रान्वये इकडील कार्यालयास कळविलेले आहे.विधी व न्याय विभागाचे संदर्भीय पत्रास अनुसरुन आकृतीबंधातील पदांचे मराठीत नामाभिधान करुन मा.डॉ.पी.एल.तिवारी विश्वस्त तथा अध्यक्ष रुग्णालय निवड समिती यांचे मान्यतेने पदांची वेतनश्रेणी व संबंधीतांना द्यावयाच्या एकत्रीत मासिक वेतनाची निश्चिती करुन एकूण रु.१०,३३,२०,९४८= ०० (रु.दहा कोटी तेहतीस लाख वीस हजार नऊशे आठ्ठेचाळीस ) मात्रचा वार्षिक वित्तीय भार असलेला आकृतीबंध दि.१७/०४/२००६ रोजी मान्यतेसाठी विधी व न्याय विभागास सादर केलेला आहे.

उपरोक्त आकृतीबंध व येणाऱ्या अंदाजे रु. रु.१०,३३,२०,९४८= ०० (रु.दहा कोटी तेहतीस लाख विस हजार नऊशे आठ्ठेचाळीस ) मात्रचे वार्षिक वित्तीय भारास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पुणे येथील सह्याद्री, रुबी हॉल, इनलॅक्स बुधरानी, वाडिया, दीनानाथ मंगेशकर, जहांगीर, इ. नामांकित रुग्णालयांना अधिकाऱ्यांनी समक्ष भेटी देऊन त्यांचकडील कर्मचारी आकृतीबंधाबाबतची माहिती आणावी व त्यानंतर व्यवस्थापन समितीचे स्थानिक सदस्यांनी सदर रुग्णालयांना भेट द्यावी. याचवेळी श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी वेळोवेळी खरेदी करण्यात येणारी विविध मशिनरी,साहित्य तसेच वैद्यकीय अधिकारी, तत्रंज्ञ व इतर स्टाफ नेमणूका इत्यादि बाबत सविस्तर चर्चा होऊन याकामी सल्ला देण्यासाठी डॉ.आगाशे,श्रीरामपूर, डॉ.बापू कांडेकर,अहमदनगर, डॉ.प्रदीप पवार, नाशिक, डॉ.बी.सदानंद,प्रवरा मेडिकल कॉलेज, विळदघाट, अहमदनगर, डॉ.वसंत कटारिया, अहमदनगर व स्थानिक सदस्यांची सुकाणू समिती स्थापन करण्यात आली. रुग्णालयासंबंधी खरेदी, वेळोवेळी येणाऱ्या अडचणी इत्यादिबाबत सदर समितीने निर्णय घ्यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१.** **श्री.विष्णू तुकाराम काळे, रा.रवंदे यांचा वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज**

**निर्णय क्र.२८२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२.** **श्री.आवारे गोरख रखमाजी,रा. वाकड यांचा वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज.**

**निर्णय क्र.२८३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३.** **व्हिडीओ कॉन्फरसिंग बाबत.**

**निर्णय क्र.२८४.** श्रीसाईबाबा रुग्णालयात विशेष अशा उच्च शाखांच्या सेवा (सुपर स्पेशालिटी सर्व्हिसेस) सुरु करण्याचे ठरले आहे.

या सर्व शाखांना लागणारे उच्च शिक्षित असे पूर्ण वेळ सल्लागार आपणांस उपलब्ध होणे सध्या अवघड जात आहे. मानद सलागारांच्या मदतीने हे केंद्र चालविता येऊ शकेल. परंतु इतर वेळी

जेव्हा कोणीही सल्लागार उपलब्ध नसेल, त्यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे असा सल्ला रुग्णाला त्वरित उपलब्ध होऊ शकतो. या विचाराने खालील दोन रुग्णालयाबरोबर पत्र व्यवहार करण्यात आला होता.

**१) बॉम्बे हॉस्पिटल,मुंबई**

**२) दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल,पुणे**

दि.११ मार्च २००६ रोजी लिहिलेल्या पत्राला फक्त दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडून प्रतिसाद मिळालेला आहे..

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने या कामासाठी सहकार्य करण्यास संमती दर्शविली आहे. अशा प्रकारची व्यवस्था आपल्या रुग्णालयात व दीनानाथ रुग्णालयात अशा दोन्ही ठिकाणी करण्यासाठी प्रत्येकी रु.६,००,०००/- असा खर्च येणार आहे. दोन्ही ठिकाणचा खर्च आपणांस करावा लागणार आहे.

➢ अशी व्यवस्था दोन्ही रुग्णालयात करण्याचा खर्च (भांडवली खर्च) रु.१२,००,०००/-

**वेळोवेळी खर्च - आवर्ती**

➢ प्रशासकीय व देखभाली निमित्त मासिक खर्च रु.७५००/- कायम सेवेसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला देणे - रु.९०,०००/- वार्षिक

➢ कन्सल्टेशन फीस जनरल स्पेशालिटी रु.१००/- प्रति सल्ला.

➢ कन्सल्टेशन फीस सुपर स्पेशालिटी रु.२००/- प्रति सल्ला.

➢ USG/CT/MRI/Cathlab Report/सल्ला रु.२००/- प्रति सल्ला.

**CME -** तंत्र शिक्षणाचे आदान प्रदान करण्याच्या उद्देशाने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात होणा-या कॉन्फरन्ससाठी श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना सामाऊन घेतले जाईल. एखादय्‍ा विदेशी व नामवंत व्याख्यात्या सोबत होणा-या सभेसाठी नाममात्र शुल्क रु.२,०००/- भरावे लागेल.

श्रीसाईबाबा रुग्णालयात रुग्णांना अद्ययावत सेवा अखंडीत देता याव्यात या दृष्टीने वरील प्रकारच्या खर्चास मान्यता मिळणेस व संगणक विभागातर्फे अशी कार्यवाही करण्याचे नियोजन व स्थापित करण्यासाठीची पुढील योजना सुरु करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. तसेच बॉम्बे हॉस्पिटलशी संपर्क साधून त्यांचेकडील प्रस्ताव यथावकाश सादर करण्यात यावा, असें ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४. श्रीसाईबाबा हॉस्पिटल स्टेशनरी छपाईबाबत.**

**निर्णय क्र.२८५.** श्री साईबाबा हॉस्पिटल लवकरच चालू करावयाचे आहे. दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरीता आवश्यक असणारी ओ.पी.डी. केस पेपर्स, कॅज्यूअल्टी पेपर्स, लॅब, सी. टी. स्कॅन फॉर्म्स, ई.सी.जी. रिपोर्ट फॉर्म्स, मेडिसीन- इंजेक्शन चार्ट वगैरे स्टेशनरी तातडीने छापून घेणे आवश्यक असल्याने स्टेशनरी छपाईकामी परिसरातील प्रेसधारकांकडून कोटेशन मागणी करण्यात आलेली आहे.

सदर छपाईकामी अंदाजे रु. ६०,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी छपाई करुन घेणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५. संस्थान कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी नविन रुग्णालयांचा समावेश करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८६.** श्री साईबाबा संस्थानचे सेवेतील कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांना वैद्यकिय उपचाराचा परतावा देण्यात येत असतो.

त्याबाबतची सध्याची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे:-

०१. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांना संस्थानचे रुग्णालयात होणारे बाहयरुग्ण उपचार, अंतरुग्ण उपचार हे संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात मोफत देण्यात येत असतात. यावेळेस त्यांना उपचारासाठी लागणारी जी औषधे गोळया, इंजेक्शन्स इत्यादी जी संस्थानचे रुग्णालयात उपलब्ध आहे ती वापरली जातात व जी संस्थानचे औषध भांडारात उपलब्ध नाही ती त्यांना बाहेरुन विकत आणणेकामी Prescription वर लिहून दिली जातात.

०२. संस्थानचे रुग्णालयात उपचार / तपासण्या होत नाही त्यासाठी संस्थानचे वैद्यकिय अधिकारी सदर कर्मचारी अथवा त्यांचे अवलंबीतांना बाहेरचे रुग्णालयात पुढील उपचार/ तपासण्याकामी श्री साईनाथ रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षिका यांचेमार्फत पाठविले जाते. याकामी मा. व्यवस्थापन समिती

सभा दि. १८.१२.२००५, निर्णय क्र. ७४७ अन्वये खालीलप्रमाणे रुग्णालये निश्चित करण्यात आलेली आहे.

| अ. नं. | रुग्णालयाचे नाव | अ. नं. | रुग्णालयाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | प्रवरा हॉस्पिटल,लोणी | १३ | ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ फिजीकल मेडीसीन,मुंबई |
| ०२ | सिव्हील हॉस्पिटल,नाशिक | १४ | नामको हॉस्पिटल,नाशिक |
| ०३ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | १५ | आनंद ऋषीजी हॉस्पिटल,अहमदनगर |
| ०४ | ससून हॉस्पिटल,पुणे | १६ | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई |
| ०५ | के.ई.एम.हॉस्पिटल,पुणे | १७ | सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल, औरंगाबाद |
| ०६ | जे.जे.हॉस्पिटल,मुंबई | १८ | रुबी हॉल क्लिनीक,पुणे |
| ०७ | के.ई.एम.हॉस्पिटल ,मुंबई | १९ | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल,पुणे |
| ०८ | लोकमान्य टिळक(सायन)हॉस्पिटल,मुंबई | २० | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई |
| ०९ | नायर हॉस्पिटल,मुंबई | २१ | सुजाता बिर्ला चॅरिटेबल हॉस्पिटल,नाशिक |
| १० | सिव्हील हॉस्पिटल,अहमदनगर | २२ | संचेती इन्स्टिट्युट ऑफ आर्थोपेडीक,पुणे |
| ११ | सेंट लूक हॉस्पिटल, श्रीरामपूर | २३ | लाईफ लाईन हॉस्पिटल,नाशिक |
| १२ | निरामय हॉस्पिटल, चिंचवड, पुणे | | |

०३. या रुग्णालयाव्यतिरिक्त जर कर्मचाऱ्याने इतर रुग्णालयात उपचार घेतले तर त्याचा परतावा करण्यात येत नाही.

०४. संस्थान कर्मचारी अथवा त्यांचे अवलंबीत यांनी संस्थान रुग्णातयात उपचार घेत असतांनी बाहेरुन आणलेल्या औषधांच्या खर्चाची बीले अथवा वरील निश्चित केलेल्या रुग्णालयात उपचार घेतल्यास येणाऱ्या खर्चाची प्रतीपुर्ती करण्यात येत असते.

०५. उपरोक्त प्रमाणे झालेल्या खर्चाची बीले प्रतीपुर्ती करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार रु. ५,०००/- पर्यंतच्या खर्चाची बीले हे मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अधिकारात वैद्यकिय अधिक्षिका यांनी शिफारस केल्यानंतर अदा करण्यात येत असतात.

०६. रु. ५,०००/- चे वरील खर्चाची बीले ही वैद्यकिय देखाभाल नियमावली सन १९९९ अन्वये अदा करण्यात येत असतात. या नियमावलीनुसार रु. ५,०००/- चे वरील प्राप्त झालेली बीले ही प्रथम वैद्यकिय अधिक्षिका यांनी तपासून त्यानुसार देय होणारी रक्कम अदा करण्याची शिफारस करण्यात येते. त्यानंतर सदर बीले ही वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ समितीपुढे (मा. व्यवस्थापन मंडळातील दोन डॉक्टर्स) मान्यतेसाठी ठेवण्यात येत असे. त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतिम मंजूरीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात येतात. त्यानुसार मंजूर झालेल्या बीलांची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांना लेखाशाखेमार्फत अदा करण्यात येत असे.

याप्रमाणे बीले प्रतीपुर्ती करण्याची सध्याची कार्यप्रणाली आहे. कर्मचारी व त्यांचे अवलंबीतांचे उपचारासाठी वरील शिफारस केलेली २३ रुग्णालये व याव्यतिरिक्त जहांगिर हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल सेंटर, पुणे या रुग्णालयाचाही यादीत समावेश करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६. A ग्रेडचा ॲलम (तुरटी) खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.२८७.** सदरहू चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७. धर्मशाळा (२० रुम) गेट ते म्हाळोबा मंदीर पर्यंतची ड्रेनेज पाईप लाईन बदली करणेकामी आलेल्या निविदा उघडणे.**
**निर्णय क्र.२८८.** सदरहू चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८. कनकुरी तलाव ते भक्तनिवासस्थान (५०० रुम) पर्यंत ३०० एमएम व्यासाची नविन पाईपलाईन टाकणेबाबत.**
**निर्णय क्र.२८९.** सदरहू चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९. शांतीनिवास इमारतीतील वाचनालयाबाबत.**
**निर्णय क्र.२९०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे प्रकाशने विभागाद्वारे दैनंदिन वृत्तपत्रे, साप्ताहिक व पाक्षिक अंक मे.महेंद्र पब्लीसीटी, शिर्डी यांचेकडून दरवर्षी खरेदी करण्यात येऊन मा.कार्यकारी

अधिकारी साहेब, सर्व प्रशासकीय अधिकारी यांचेसाठी १ सेट तसेच शांतिनिवास इमारतीतील वाचनालयात साईभक्तांसाठी १ सेट याप्रमाणे एकूण २ सेट वृत्तपत्रांची खरेदी करण्यात येऊन पुरविण्यात येतात.

शांतिनिवास इमारतीतील वाचनालयाध्ये दैनंदिन वृत्तपत्रे वाचनासाठी साईभक्तां ऐवजी बहुतांशी फुल एजंट व भिक्षुक येत असतात व तेच तेथे बराच वेळ बसून राहातात असे निदर्शनास आले आहे. सदर वाचनालयाचा भक्तांना उपयोग होत नसल्याने शांतिनिवास इमारतीत असलेले वाचनालय कक्ष बंद करावे असे वाटते.

तरी शांतिनिवास इमारतीतील वाचनालय कक्ष बंद करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकरी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०. टायर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९१.** वाहन विभागात कार्यालयीन वापरात असलेली वाहने कायम मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद इ. ठिकाणी संस्थानचे कामाकरीता पाठवावे लागतात. त्यातील खालील वाहनांची टायर्स खराब झालेली असल्याने नवीन खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्र. | वापर | एकूण कि. मी. वापर | टायर साईज | टायर नग |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच- १७ / के- १८०१ | कार्यालयीन | ५१,१०६ | २१५/७५/R-१५ टायर, टयुब, फ्लॅपसह | ५ |
| ०२ | एमएच- १७ / सी- ३५३६ | कार्यालयीन | ५१,८४० | २१५/७५/R-१५ टायर, टयुब, फ्लॅपसह | ५ |
| ०३ | एमएच- १७ / एच- ११०१ | कार्यालयीन | ६०,९९३ | २१५/७५/R-१५ टायर, टयुब, फ्लॅपसह | ५ |
| ०४ | एमएच- १७ / सी- ६७६९ | शववाहिनी | ४२,२२० | ७/५०/१६ टायर, टयुब, फ्लॅपसह | ५ |
| ०५ | एमएच- १७ / सी- ७३८१ | मालवाहतुक | ४४,१६९ | ७/५०/१६ टायर, टयुब, फ्लॅपसह | ४ |

वरीलप्रमाणे वाहनांना टायर्स खरेदीकामी रु. १,००,०००/-मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदर टायर्स APPLLO (Radial) या नामांकित कंपनीचे अधिकृत डिलर्स कडून खरेदी विभागामार्फत कोटेशन बोलावून करणेत येतील.

तरी वरीलप्रमाणे २४ टायर, टयुब, फ्लॅपसह खरेदीस व येणारे अंदाजे रु. १,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११. प्रसादालयातील डाईनींग टेबल दुरुस्त करणेसाठी एम.एस. स्क्वेअर पाईप व जी.आय.राऊंड पाईप खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२.** प्रसादालयात दररोज सरासरी १६५०० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. त्यांचे दैनंदिन प्रमाण सुमारे १२,००० ते ३०,००० असते. साईभक्तांना प्रसाद भोजन घेण्यासाठी १९२ टेबल्स ठेवण्यात आलेले आहेत. सदर टेबल्स सुमारे १० वर्षापूर्वी बनविलेले असून टेबलचा फक्त टॉप व पाय स्टेनलेस स्टीलचे असून बाकी सर्व फ्रेमवर्क एम.एस.(लोखंडी) आहे.

प्रसादालयात दैनंदिन वेळोवेळी साफसफाई करतांना पाण्याचा वापर करावा लागतो. पाण्याच्या वापरामुळे लोखंडी फ्रेमला गंज येऊन खराब झालेल्या आहेत. विद्युत विभागाकडून दुरुस्ती करतांना वेल्डींग करण्यात येते. उपरोक्त १९२ टेबलपैकी ५० टेबलच्या लोखंडी फ्रेम वेल्डींग करण्यायोग्य राहीलेल्या नाहीत. त्यामुळे आता तातडीने प्राथमिकता म्हणून ५० टेबलसाठी लागणा-या टॉपच्या नविन फ्रेम तयार करणेचे आहे.

नविन प्रसादालय व त्याकामी होणारे नविन फर्निचर यास सुमारे दीड / दोन वर्षाचा अवधी लागणार आहे. सध्य टेबलांची लोखंडी फ्रेम खराब होत चालल्याने टेबलांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस टेबलांची संख्या कमी होऊन साईभक्तांची प्रसाद भोजनास बसण्यासाठी गैरसोय होऊ नये, म्हणून सध्या ५० टेबलसाठी नविन फ्रेम करणे गरजेचे आहे, असे प्रसादालय विभागाने दि.०८-०३-२००६ चे पत्रानुसार कळविले आहे. प्रसादालय विभागाकडील हॉलमधील जेवणाचे ५० नग टेबलसाठी नविन फ्रेम करणेसाठी पुढीलप्रमाणे मटेरीअलची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस. स्क्वेअर पाईप,<br>साईज - २५ x २५ x ३ एम.एम.,टाटा/झेनिथ मेक | १,२५० फुट | रु. २१/-<br>(प्रति फुट) | ०,२६,२५०.०० |
| ०२) | एम.एस. स्क्वेअर पाईप,<br>साईज - ४० x ४० x ३ एम.एम.,टाटा/झेनिथ मेक | २,५००<br>फुट | रु. २७/-<br>(प्रति फुट) | ०,६७,५००.०० |
| ०१) | १ इंच सी क्लास<br>जी.आय.राऊंड पाईप.,प्रकाशसुर्या /टाटा मेक | ०,४००<br>फुट | रु. ३०/-<br>(प्रति फुट) | ०,१२,०००.०० |
| | | | **पुर्णांकित रक्कमः-** | **१,०५,७५०.००** |

उपरोक्तप्रमाणे एम.एस.स्क्वेअर पाईप व जी.आय. राऊंड पाईप कोटेशन बोलावून खरेदी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेतबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. शिधा सामुग्री मिळणेबाबतचे अर्ज**

**(अ) सचिव,समस्त गाथा पारायण सोहळा समिती व समस्त भोजडे व कान्हेगाव ग्रामस्थ ता.कोपरगाव, जि.अहमदनगर**

**(ब) अध्यक्ष,समस्त गावकरी मंडळी व सप्तश्रृंगी देवी मंदीर, नांदुर्खी बु|| ता.राहाता, जिल्हा अहमदनगर**

**(क) अध्यक्ष, सप्ताह उत्सव समिती श्री.ह.भ.प.काशिनाथ महाराज भालेराव सेवाभावी ट्रस्ट, निमगाव (शिर्डी), पो.लक्ष्मीवाडी, ता.राहाता, जि.अहमनगर.**

**(ड) श्री.कैलास तांबे,सरपंच, श्री स्वामी समर्थ सेवेकरी व ग्रामस्थ, मु.पो.चिंचपूर,ता.संगमनेर.**

**(इ) श्रीस्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) शिर्डी (शिव), ता.राहाता, जि.अहमदनगर**

**निर्णय क्र.२९३.** खालील दर्शविलेल्या ग्रामस्थांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| **अ.** | सचिव, समस्त गाथा पारायण सोहळा समिती व समस्त भोजडे व कान्हेगांव ग्रामस्थ , ता.कोपरगांव, जि.अहमदनगर, | भोजडे व कान्हेगांव येथे भागवत कथा ज्ञानयज्ञ व जगत् गुरु तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा दि.१६/४/०६ ते २५/४/०६ अखेर संपन्न होणार असून त्यासाठी शिधा स्वरुपात मदत. | वस्तुरुपात शिधा म्हणून मदत रुपये २५,०००/- पर्यत |
| **ब** | अध्यक्ष, समस्त गांवकरी मंडळी, व श्री सप्तश्रृंगी देवी मंदिर, नांदुर्खी बु. ता.राहाता, जि.अहमदनगर | श्री सप्तश्रृंगी देवीची मूर्तीची प्राणप्रतिष्ठा श्री क्षेत्र नांदुर्खी बु. येथे दि.०४/०५/२००६ आयोजित केले असून महाप्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | वस्तुरुपात शिधा म्हणून मदत रुपये ११,०००/- पर्यत |
| **क** | अध्यक्ष, सप्ताह उत्सव समिती, श्री ह.भ.प.काशिनाथ महाराज भालेराव सेवाभावी ट्रस्ट संचलित श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज मंदिर व श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, साईबाबा नगर,मु. निमगांव (शिर्डी), पो.लक्ष्मीवाडी, ता. राहाता, जि. अहमदनगर | द्वितीय मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त दि.२४/०४/०६ ते दि.०१/०५/२००६ अखेर ग्रंथराज ज्ञानेश्वरी व साईचरित्राचे पारायण आयोजित केले असून महाप्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | वस्तुरुपात शिधा म्हणून मदत रुपये २५,०००/- पर्यत |
| **ड** | श्री.कैलास पा.तांबे, सरपंच, ग्रामपंचायत चिंचपूर व श्री स्वामी समर्थ सेवेकरी, व ग्रामस्थ, मु.पो.चिंचपुर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, | चिंचपूर केंद्रात प.पू.गुरुमाऊलीचे उपस्थितीत शेतकरी मेळावा दि.८/५/२००६ रोजी संपन्न होणार असून त्यासाठी शिधा स्वरुपात मदत. | वस्तुरुपात शिधा म्हणून मदत रुपये २५,०००/- पर्यत |
| **इ** | श्रीस्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) , शिर्डी (शिव केंद्र) ता.राहाता, जि.अहमदनगर, | केंद्रामार्फत प.पू.गुरुमाऊलीचे आशिर्वादाने श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर गुरुकुल पीठावर कोटीचंडी याग संपन्न होणार असून त्यासाठी जमलेल्या भाविक व सेवेक-यांना महाप्रसाद द्यावयाचा आहे. | तांदुळ, रवा, साखर, तुप, तेल, शेंगदाणे, साबुदाणा इ. वस्तुपात शिधा म्हणून मदत रुपये २५,०००/- पर्यत |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्याचप्रमाणे शिधा स्वरुपातील मदत देणेबाबतची नियमावली संस्थानने तयार केलेली असून मा.प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेली आहे. त्यावर निर्णय होणे बाकी आहे.

तथापि उपरोक्त सर्व कार्यक्रम धार्मिक स्वरुपाचे असून, विश्वकल्याणासाठी, सजीवसृष्टीच्या सर्वोत्तोपरी कल्याणासाठी, भारतभूमी, भारतमाता, बंधू भावांच्या नात्याने नांदणा-या सर्व भाविकांना सुखी राहण्यासाठी, वाईट अरिष्ट येवू नये म्हणून, तसेच भुकंप, त्सुनामी लाटा, भ्रष्टाचार, निसर्ग आपत्ती, दारिद्रय हरणार्थ करण्यात येणार असून एक विशेष बाब म्हणून अ.नं.**"अ","क","ड", "इ,"** यांना रु. २५,०००/- मात्रचा तसेच, अ.नं. **"ब"** यांना रुपये ११,०००/- मात्रचा शिधा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३.** **कंत्राटी पदांची मुदत वाढवून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९४.** **अ)** संस्थानकरीता भू-संपादन करणेकामी उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली सुरु करण्यात आलेल्या कक्षाची मुदत दि.०१/११/२००५ पासून पुढे सहा महिन्याकरीता (दि.३०/०४/२००६अखेर) वाढविण्यात आलेली आहे त्याचवेळी श्री साईबाबा संस्थानचे प्रशासन शाखा विधी विभाग कार्यालयाकडे सदरकामी मदत करणेसाठी श्री रायपल्ली यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५५१/२००५ दि.२३/०९/२००५ अन्वये कंन्सलटंट म्हणून दि.२७/०९/२००५ रोजी पासून पुढे सहा महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली आहे.

तथापि,श्रीरामपूर भू-संपादन कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमणूकीस असलेले श्री गर्जे यांनी राजीनामा दिल्यामुळे संबंधीत कक्षाचे कामाची अडचण होवू नये म्हणून श्री.रायपल्ली यांना दि.०१/११/२००५ पासून सदर कक्षाकडे काम पहाणेबाबत आदेशीत करण्यात आलेले असून सदरची त्यांची कंत्राटी पध्दतीची मुदत दि.३१/०३/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

त्यांनी दि.२७/०३/२००६ रोजीचे विनंती अर्जाने या पदाची मुदत वाढवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी श्री रायपल्ली यांचे अर्जावर,"अर्जदार श्री रायपल्ली यांचे अर्जाप्रमाणे मुदतवाढ देण्यास हरकत नाही."असे नमूद केले आहे.

त्यावर विधी विभाग प्रमुख यांचा अभिप्राय मागविला असता त्यांनी,

०१ आरक्षण क्र.३४ सर्व्हे नं. १२५ बाबत जमीन खरेदी बाबत ठराव झालेमुळे भूसंपादीत या भसंपादनाचे काम अखेरचे टप्प्यात आहे.

०२ आरक्षण क्र. ३९ भूसपांदनाचे काम अंतिम टप्प्यात आहे. रक्कम प्रारुप आराखडयाप्रमाणे भरली आहे. अवार्डचे काम अंतिम टप्प्यात आहे.

०३ शेती महामंडळ जमीन भूसंपादनाने संस्थान ताब्यात आली आहे.

०४ आता भूसंपादनाचे कामकाज बांधकाम विभागामार्फत पाहील जाते.त्यामुळे प्रकरणी बांधकाम विभागाचा अहवाल विचारात घेणेस विनंती आहे. भू-संपादनाबाबत वरिल प्रकरणांचे कामे झाली आहेत. "असा अभिप्राय दिला असून,त्यावर प्रशासकीय अधिकारी (विधी विभाग)यांनी "श्री रायपल्ली यांचा या कामकाजाशी संबंध नाही ते श्रीरामपूर येथे कामाला आहेत." असे अभिप्राय दिले आहेत.

श्रीरामपूर-भू संपादन कक्षाची वाढविण्यात आलेली मुदत दि.३०/०४/२००६ अखेर संपुष्टात येत असल्याने तसेच भू-संपादनाकडे असलेली कामे अंतीम टप्प्यात असल्याने तसेच विधी अधिकारी विधी विभाग व प्रशासकीय अधिकारी (विधी विभाग ) यांचे अभिप्राय विचारात घेऊन श्री रायपल्ली यांची कंत्राटी पध्दतीची मुदत दि.०१/०४/२००६ ते ३०/०४/२००६ अखेर एक महिना वाढविता येईल, असे मत आहे.

**तसेच :-**

**ब)** प्रशासन शाखा विधी विभागाकडे कोपरगांव न्यायालयात ४४ प्रकरणे,औरंगाबाद खंडपीठात ०७ प्रकरणे व मुंबई उच्च न्यायालयात एक प्रकरण अशी एकूण ५२ प्रकरणे (दिवाणी फौजदारी) न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच विविध कारणांसाठी जमीन संपादन विषयक प्रस्ताव चालू असल्याने सदरच्या कामांसाठी मदत व्हावी म्हणून श्री.रायपल्ली व श्री.रणशुर यांचे प्रमाणेच श्री सिताराम चंद्रभान वाखुरे,ॲडव्होकेट यांची कंत्राटी पध्दतीने रु.७,०००/- (अक्षरी रु.सात हजार ) मात्र एकत्रीत मानधनावर दि.२१/१०/२००५ पासून पुढे सहा माहिन्यासाठी नेमणूक करण्यात आलेली असून सदरची मुदत दि.२०/०४/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री.वाखुरे यांनी उपरोक्त संदर्भ क्र. (ब )-०२ अन्वये अर्ज सादर करुन त्यात," माझ्या नेमणूकीच्या कालावधीची मुदत एक वर्ष वाढवून मिळणेबाबत विनंती केलेली असून, त्यावर प्रशासकीय अधिकारी यांनी जा.नं.एसएसएस/वशी-०२/०६/२००६ चे पत्रान्वये," श्री वाखुरे कंत्राटी सल्लागार हे कोर्ट केसेस तारखेस हजर राहणे तसेच इकडील विभागातील कोर्ट कामाचे कार्यालयीन कामकाज सादर करणे अशा स्वरुपाची कामे त्यांनी केलेली आहे व करीत आहेत.त्यानुसार त्यांची कंत्राटी पध्दतीची मुदत ०३ ते ०६ महिने वाढविण्यास हरकत नाही. मात्र विधी विभागाचे जबाबदारीचे व कामाचे स्वरुप पाहता संस्थान सेवेतील कर्मचारी मिळालेस अधिक उचीत होईल असे असे नम्र मत आहे." असे कळविले केलेले आहे.

उपरोक्त श्री वाखुरे यांचे अर्जातील विनंती व विधी अधिकारी विधी विभाग व प्रशासकीय अधिकारी विधी विभाग यांचे अभिप्राय विचारात घेवून श्री वाखुरे यांची कंत्राटी पध्दतीची मुदत दि.२१/०४/२००६ पासून पुढे सहा महीन्यांसाठी वाढविण्याबाबत विचार करता येईल.

तरी उपरोक्त **" अ "** व **" ब "** निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित **"अ"** प्रमाणे श्री.रायपल्ली यांची कंत्राटी पध्दतीची मुदत दिनांक ०१/०४/२००६ ते दिनांक ३०/०४/२००६ अखेर पूर्वीचेच अटी व शर्तीवर एक महिना वाढविणेस, व **"ब"** प्रमाणे श्री.वाखुरे यांची कंत्राटी पध्दतीची मुदत दि.२१/०४/२००६ पासून पुढे सहा महीन्यांसाठी पूर्वीचेच अटी व शर्तीवर वाढविण्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी श्री.चंद्रकांत जयवंत रणशूर, कन्स्टल्टंट,भू-संपादन यांची दि.११.५.२००६ रोजी कंत्राटी सेवेची मुदत संपत असल्याने त्यांना पूर्वीचेच शर्ती/अटींवर १ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४.** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध ठिकाणी ए.सी.बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.२९५** मा. सदस्य डॉ.पी.एल. तिवारी यांनी दि. २२.०४.२००६ रोजी दुपारी ४.०० वाजता श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राऊंड घेऊन समक्ष पाहणी करुन गरजेनुसार अपूर्ण वाटणाऱ्या, तसेच हॉस्पिटलमध्ये आवश्यक असलेल्या विविध बाबीबाबत करावयाच्या कामांबाबत सूचना देऊन व त्यांची त्वरीत पूर्तता करण्याचे आदेशही दिले आहेत.

त्यात ओ.पी.डी. च्या सर्व कन्सल्टींग रुम्स तळमजल्यावरील १६ खोल्या व पहिल्या मजल्यावरील १ खोली, एक्स-रे रुम, डायरेक्टर व डेप्युटी डायरेक्टर यांच्या कॅबीन्स, इंटेन्सीव्हिस्ट रुममध्ये २ असे एकूण २२ नग ए.सी. त्वरीत खरेदी करुन बसविणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

सदर कामी विद्युत विभाग प्रमुखांकडे संपर्क केला असता सदर ठिकाणी ए.सी. बसविणेस प्रत्येक नगास पुर्वीचे मान्य दराने रु.२७,०००/- मात्र खर्चाप्रमाणे २२ नगांसाठी एकूण रु.५,९४,०००/- खर्च अपेक्षित असल्याचे समजले, किंवा काही कारणास्तव (उदा. व्हॅट वगैरमुळे) यापेक्षा थोडयाफार होणाऱ्या जादा खर्चासही मान्यता मिळून सुमारे सहा लाख पर्यंतचे खर्चास मंजूरी असावी ही विनंती.

तरी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही त्वरीत करणेस व कामी येणाऱ्या अंदाजे रुपये ०६ लाखपर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत् विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१५.** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांचे कन्सल्टटेशन रुममधून बसविण्यात येणाऱ्या प्रस्तावित २२ ए.सी. साठी लागणारी केबल मेनस्विच,गलँड व लग्ज खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२९६.** मा.विश्वस्त, श्री. डॉ.तिवारीसाहेब यांचा दि.२२-०४-२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलकडे राऊंड झाला असता त्यांनी सर्व डॉक्टरांचे कन्सल्टटेशन रुममधून २२ ए.सी. बसविण्याबाबत आदेश दिलेले आहेत. या ए.सी.बाबत पुर्वीच्या कामात तजवीज केलेली नव्हती. त्यामुळे आता या ए.सी.साठी वीजपुरवठा करण्यासाठी सबस्टेशन -जनरेटररूमपासून स्वतंत्र केबल टाकावी लागणार असून डिस्ट्रिब्युशन बोर्ड ठिकठिकाणी बसवावे लागणार आहेत. त्यासाठी खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर ( अंदाजे ) रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | पॉलीकॅब / फिनोलेक्स / ॲकर मेक आय. एस. आय. ॲप्रुव्हड ॲल्युमिनिअम आरमड पीव्हीसी केबल, साईज - ३.५ x १५० स्क्वे.एम.एम. | ३५० मीटर | रु. ४५०/- (प्रति मीटर अंदाजे) | १,५७,५००.०० |
| ०२) | पॉलीकॅब / फिनोलेक्स / ॲकर मेक आय. एस आय. ॲप्रुव्हड ॲल्युमिनिअम आरमड पीव्हीसी केबल, साईज - ३.५ x ०५० स्क्वे.एम.एम. | ३७५ मीटर | रु. १६०/- (प्रति मीटर अंदाजे) | ०,६०,०००.०० |
| ०३) | पॉलीकॅब / फिनोलेक्स / ॲकर मेक आय. एस आय. ॲप्रुव्हड ॲल्युमिनिअम आरमड पीव्हीसी केबल, साईज - ३.५ x ०२५ स्क्वे.एम.एम. | ३७५ मीटर | रु. ११३/- (प्रति मीटर अंदाजे) | ०,४२,३७५.०० |
| ०४) | एल.ॲड.टी.मेक, एच.आर.सी. टीपीएन स्विचफ्युज युनिट इन शीट मेटल बॉक्स विथ फ्युजेस ॲड विथ केबल एन्ड बॉक्सेस, क्षमता ४०० ॲम्पीअर, | ०४ नग | रु. ७०००/- (प्रति नग अंदाजे) | ०,२८,०००.०० |
| ०५) | एच.एम.आय.मेक फ्लॅंज टाईप केबल ग्लॅंड,<br>०१)०नंबर (५० स्क्वे.एम.एम..केबलसाठी)<br>०२)००१नंबर(१५०स्क्वे.एम.एम केबलसाठी)<br>०३) ११ नंबर (२५ स्क्वे.एम.एम.केबलसाठी) | <br>१२ नग<br>०३ नग<br>०६नग | <br>रु. ३५/- (प्रति नग )<br>रु. ६०/- (प्रति नग )<br>रु. २६/- (प्रति नग ) | <br>०,००,४२०.००<br>०,००,१८०.००<br>०,००,१५६.०० |
| | | | एकुण रक्कम :- | २,८८,६३१.०० |

उपरोक्त प्रमाणे मटेरीअल कोटेशन बोलावून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- विद्युत् विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ओ.टी.व कॅथलॅब चे कंझ्युमेबल साहित्य ठेवणेसाठी रॅक तयार करणे व औषध दुकानासाठी काऊंटर तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९७.** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीयाक ओ. टी. व कॅथलॅब चे कंझ्युमेबल साहित्य ठेवणेसाठी सात रॅक्स व औषध दुकानासाठी काऊंटर हे फर्निचर प्लायवूडमध्ये तयार करुन मिळणेबाबत वरिष्ठ प्रशासक (रुग्णालये) यांनी मागणी केलेली आहे.

उपरोक्त फर्निचर तयार करणेसाठी संस्थान पॅनेलतरील आर्किटेक्ट शितल पी. जोशी, श्रीरामपूर यांचेकडून प्लॅन व एस्टीमेट तयार करुन घेण्यात आले आहेत. त्यानुसार सदर कामासाठी अंदाजे रु. ३,४२,८६२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास व या कामासाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७. संगणकीकृत गुन्हेगार शोध कार्यप्रणाली बाबत.**

**निर्णय क्र.२९८.** उपरोक्त विषयान्वये सादर की, श्रीसाई मंदिर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे महत्वाचे धार्मिक स्थळ आहे. संपुर्ण भारतातुन तसेच-परदेशातुन भक्त दर्शनाकरीता येतात. त्यात सर्व क्षेत्रातील महत्वाच्या, अति महत्वाच्या व्यक्तीचा समावेश असतो.साई मंदीर व मंदीर परिसरात भक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने संधिचा फायदा घेण्याकरीता जिल्ह्यातुन व वेगवेगळ्या राज्यामधुन गुन्हेगार येतात. तसेच मोठ्या शहरातील गॅंगस्टार, गुन्हेगार दर्शनाकरीता येऊन शिरडी येथे वास्तव्यास असतात. त्यांचे कडे सर्व प्रकारचे अत्याधुनिक साधने असतात.

सध्या समाजविघातक कृत्य करणा-या लोकांनी देशातील महत्वाच्या व गर्दी असलेल्या देवस्थानांवर लक्ष केंद्रित केलेले आहे. गुन्हेगारीवर प्रतिबंध करणे करिता खालील अत्याधुनिक व संगणकीकृत कार्यप्रणाली वापरणे आवश्यक वाटते. सदर संपुर्ण यंत्रणा अहमदनगर जिल्हा पोलीस अधिक्षक विभाग यांचेकडे हस्तांतरीत करुन त्यांचे नियंत्रणाखाली कार्यरत राहिल.

- गुन्हेगार व अतिरेकी ओळखण्या करीता मंदिर व मंदिर परीसरात फेस मॅचिंग सिस्टिम.
- गुन्हेगार, समाज कंठक व अतिरेकी कारवाया करणा-या व्यक्तींची परीपुर्ण ओळख तात्काळ (काही सेकंदात) पटण्याकरीता Computerised Scientific Criminal Search System
- अटक केलेल्या गुन्हेगारांची परीपुर्ण माहिती प्राप्त करण्यासाठी Computerised Arrested Accused Search System.

वरील कार्यप्रणाली (system) कार्यरत करणे करिता शिरडी येथे Main Data Server Centre, व अहमदनगर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे, साईबाबा संस्थान संरक्षण विभाग येथे Connectivity राहणे करिता नियंत्रण कक्ष अहमदनगर येथे Sub Server Centre व जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये व सर्व पोलीस स्टेशन इंटरनेट (Broad Band) Connectivity देणे संपर्काच्या दृष्टीकोनातुन अत्यावश्यक आहे. जेणे करुन संबंधीत पोलीस स्टेशन कडुन गुन्हेगारांची परिपुर्ण माहिती तात्काळ मिळु शकते. त्या माहिती वरुन गुन्हेगारावर योग्य कार्यवाई करता येईल. त्या करिता खालील प्रमाणे अत्याधुनिक उपकरणे व साहित्य खरेदी करण्याची गरज आहे.

१. शिरडी येथे Main Server Centre व संगणक, संगणक कक्ष

२. नियंत्रण कक्ष अहमदनगर येथे Sub Server Centre कक्ष

३. पोलीस अधीक्षक कार्यालय,स्थानिक गुन्हे शाखा, उपविभागीय पोलीस अधीकारी कार्यालये तसेच जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन याठिकाणी प्रत्येकी एक संगणक मल्टीमिडीया किट सह, वेब कॅमेरा,स्कॅनर, प्रिंटर इ.

४. साईबाबा मंदीर येथे फेस मॅचिंग करिता कॅमेरे व इतर तत्सम साधने व साम्रुगी

५. Broad Band Internet Connectivity

६. Scientific Crminal Search System व Arrested Accused Search System software

वरील सर्व यंत्रणा खरेदी करणेसाठी एकुण अंदाजे रु. ४५,३५,०००/- (रुपये पंचेचाळीस लक्ष पस्तीस हजार) अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. याबाबत शासनाची मान्यता घेणेत यावी.

(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. मायक्रोमोटार खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२९९.** श्रीसाईनाथ रुग्णालयातील इ.एन.टी. शस्त्रक्रिया करणेसाठी वरील मोटार वापरतात. यापुर्वी आपल्याकडे असलेली कंपनीची मोटार सन २००१ साली मे. ऑल इंडीया सर्जिकल, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात आली

होती. ती मोटार वापरुन खराब झालेली आहे. त्यामुळे सदर मोटार दुरुस्तीसाठी मे. ऑल इंडीया सर्जिकल, मुंबई यांचेकडे इकडील पत्र क्र. २४५० दि. २३/०२/२००६ अन्वये दुरुस्तीसाठी पाठविण्यात आली होती. परंतु त्यांनी सदरची मोटार दुरुस्त होत नाही व या कंपनीचे उत्पादन देखील बंद झालेले आहे असे दुरध्वनीवरुन विचारणा केली असता सांगितले आहे.

सदरची मोटार दैनंदिन शस्त्रक्रियासाठी आवश्यक असते. सदरची मोटार नसल्यामुळे सध्या रुग्ण शस्त्रक्रियेचे प्रतिक्षा यादीवर आहेत. याकामी अंदाजे रु. ५०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी आवश्यक असणारी मायक्रोमोटार कोटेशन मागवून निम्नत्तम दरानुसार खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९.** **ब्राह्मणगाव फळबाग सहकारी संयुक्त शेतकी सोसायटी लि.,कोपरगाव यांना गाळा (स्टॉल) फळविक्रीसाठी व साईगंगाची (मिनरल वॉटर) विक्री करणेकामी भक्तनिवास ५०० रुममध्ये स्टॉल-गाळा देणेबाबत.**

**निर्णय क्र.३००.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०.** **श्री साईनाथ रुग्णालय (धर्मशाळा इमारत) येथील बाहयरुग्ण (OPD) विभागास दरवाजे बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३०१.** श्री साईनाथ रुग्णालय सध्या नविन धर्मशाळा क्र. २ इमारतीत कार्यान्वित आहे. सदर रुग्णालयात चार इंच जाडीच्या बीट बांधकामातील भिंतीचे पार्टीशन करुन तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकिय अधिकाऱ्यासाठी केबीन्स तयार करण्यात आल्या आहेत. वैद्यकिय अधिक्षिका यांनी दि.४.४.२००६ रोजीचे पत्राद्वारे डॉक्टर केबीनला एकूण बारा दरवाजे बसवून मिळणेस विनंती केली आहे.

सदर केबीनसाठी फ्रेमसह ॲल्युमिनिअम दरवाजे बसविण्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. no. | Discription | No | Qty Sqft. | Rate per sqft | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing & Fixing Alu. Doors of 45 mm size top & middle rail & novapan board & 5 mm thick float glass including Handle & Central lock<br>36.4" x 84" x 4 nos.<br>51" x 84" x 8 nos. | <br>4<br>8 | <br>84.93<br>238.00 | | |
| | | | 322.93 | 140 Rs | 45,210.20 |

वैद्यकिय साहित्याच्या, सुरक्षिततेच्या दृष्टीने दरवाजे बसवणे आवश्यक आहे असे वैद्यकिय अधिक्षिका यांनी कळविले आहे. याकामी वरीलप्रमाणे अंदाजे रु. ४५,२१०.०० मात्र खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. सदरील काम विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून पूर्ण करण्यात यावे.

तसेच, सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल मधील कॅथ लॅबचे जवळील खोलीमध्ये वॉल पॅनलींग, कॅथलॅब, ओ. टी. जवळील दरवाजांना प्लॅश शटर्स लॅमीनेटसह बसविणे, आवश्यक रंगकाम इत्यादी कामे ठेकेदार मे. एन. बी. औताडे यांचेकडून करुन घेणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१.** **कॅन्टीन हॉलमध्ये ठेवणेससाठी स्टेनलेस स्टीलचे टॉपचे टेबल खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०२.** कॅन्टीन हॉलमधील साईभक्तांना बसून चहा पिण्याकरीता फायबर खुर्च्या ठेवलेल्या आहेत. या खुर्च्यामध्ये साईभक्त जास्तवेळ बसून राहतात. त्यामुळे चहा, कॉफी घेणारे व पिणारे साईभक्त यांचा गोंधळ निर्माण होतो. मा.अध्यक्षमहोदय यांचा दिनांक ३१-१२-२००५ रोजी रात्री ८.०० वाजता कॅन्टीन विभागात राऊंड घेतला असता त्यांनी, स्टेनलेस स्टील टॉपचे टेबल साधारणत: ४ ते ४.१/२ फुट उंच, २ फुट रुंद व ६ फुट लांब या मापाचे बसवावेत, जेणेकरुन साईभक्त गर्दीचे वेळी हॉलमध्ये जादा वेळ न बसता चहा पिऊन पटकन बाहेर पडतील अशी कॅन्टीन विभाग प्रमुखांना सुचना केली होती.

कॅन्टीन विभाग प्रमुख यांनी विद्युत विभागाकडे कळविल्यानंतर उपरोक्त मापाचा एक टेबलाचा नमुना तयार करून तो कॅन्टीन विभाग प्रमुखांना दाखविण्यात आला व हा टेबलाचा नमुना मा.अध्यक्षमहोदय यांचे सुचनेनुसार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. एका टेबलसाठी अंदाजे रु. ७,५००.०० इतका खर्च येईल.

कॅन्टीन विभाग प्रमुख यांनी वरीलप्रमाणे कळविलेल्या मापाचे स्टेनलेस स्टील टॉपचे ३० नग टेबल बनवून घेणेसाठी प्रती टेबल रु.७,५००.०० प्रमाणे ३० टेबलसाठी रु. २,२५,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी कॅन्टीसाठी उपरोक्त मापाचे स्टेनलेस स्टील टॉपचे टेबल बनविणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चाा मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकरी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन कॅन्टीनसाठी आवश्यक असणारे उपरोक्त मापाचे ३० स्टेनलेस स्टील टॉपचे टेबल फॅब्रिकेटर्स कडून कोटेशन्स मागवून बनवून घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,२५,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२२. मोबाईल जॅमर बाबत.**
**निर्णय क्र.३०३.** उपरोक्त विषयान्वये सादर की, मा. पोलिस अधिक्षक सो. अहमदनगर यांनी मंदिर परिसराची पहाणी करुन मोबाईल जॅमरच्या संख्येत वाढ करणे बाबत कळवले आहे. सध्या समाधी मंदिर व शांतिनिवास, भक्तनिवास तळमजला दर्शनहॉल येथे जॅमर बसविण्यात आले आहे. परंतु शांतिनिवास, भक्तनिवास पहिल्या मजल्या वरिल दर्शनहॉलमध्ये जॅमर बसविलेले नाही. तसेच म्युझियम मध्ये जॅमर बसविलेले नाही त्याठिकाणी जॅमर बसविणे आवश्यक आहे. त्याकरीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

- मोबाईल जॅमर ७ नग १,७५,०००/-

दि.०७ मार्च २००६ रोजी वाराणसी (उत्तर प्रदेश) येथील संकटमोचन हनुमान मंदिर त्याचप्रमाणे वाराणसी येथील कॉन्टलमेंट स्टेशन येथे बॉम्बस्फोट झाले त्यामुळे भारतातील सर्व राज्यामध्ये अतिदक्षतेचा (रेट अलर्ट) इशारा देण्यात आला.

दि.१० मार्च २००६ रोजी मा.पोलिस अधिक्षक यांचे समावेत दर्शनरांगेत राऊंड घेतला असता शांती निवास तळमजला दर्शनरांगेत मोबाईल जॅमरचा परिणाम दिसुन आला नव्हता त्यावर तांत्रीक बाजु तपासुन संबधितास ताबडतोब बोलावुन दुरुस्ती करावी असे सांगीतले. त्यानुसार संरक्षण अधिकारी यांनी क्लिक सॉफ्टचे मालक श्री. विनायक यांना दि. १६ मार्च २००६ रोजी बोलावुन सदर बाबत पहाणी केली असता शांतीनिवास दर्शनरांग तळमजला हॉलमध्ये मोबाईल जॅमरची संख्या कमी असल्याचे श्री. विनायक यांनी सांगितले.

आपण यापुर्वी दि. २६ सप्टेंबर २००५ रोजी ०९ जॅमर मशिन समाधी मंदिर व दर्शनरांगेत बसविलेले आहेत. दुसऱ्या टप्यामध्ये दर्शनरांगेच्या वरिल हॉलमध्ये व साईबाबा वस्तुसंग्राहलयात ०७ नग जॅमर मशिन बसविणे गरजेचे आहेत. क्लिक सॉफ्ट कंपनिचे मालक श्री. विनायक यांचे बरोबर संरक्षण अधिकारी यांनी किंमती बाबत समक्ष चर्चा केली असता क्लिक सॉफ्ट कंपनिचे माल श्री. विनायक हे पुर्वीच्याच किंमतीमध्ये नव्याने खरेदी करावयाचे ०७ जॅमर मशिन देण्यास तयार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणात साईभक्तांचे भ्रमर दुरध्वनी लॉक करुन ठेवणेसाठी सात नग मोबाईल जॅमर खरेदी करण्यास व या कामी येणारी अदांजे रक्कम रुपये १,७५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२३. माढेश्वरी महिला बचत गटाने तयार केलेले द्रोण खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.३०४.** मालती पेपर मोल्डींग, कोल्हापूर अंतर्गत माढेश्वरी महिला बचत गट, १३३/१३, सुभद्रा नगरी, लक्ष्मी विष्णू मिल चाळ, सोलापूर यांनी कोल्हापूर व सोलापूर येथे महिला बचत गटातील महिलांनी द्रोण बनविण्याचा व्यवसाय सुरु केलेला आहे. त्यांच्या बचत गटातील महिलांनी हे द्रोण अत्यंत सुरेख व चांगल्या क्वालिटीचे बनविलेले आहेत. तसेच त्यांनी ३५० मशिनवर ७०० महिलांना रोजगार दिलेला आहे. सदरील द्रोण प्रती १००० नगास (पोहोच) रुपये १८२/- असा दर कळविलेला असून, मा.अध्यक्ष साहेबांनी महिला बचत गटाने सुरु केलेल्या व्यवसायाला प्राधान्य देऊन सहकार्य करावे व आम्हास श्रीसाईबाबांची सेवा करण्याची संधी द्यावी अशी दिनांक २४.४.२००६ चे पत्राने, त्यांनी विनंती केलेली आहे.

तसेच आजचे सभेत या महिला गटाच्या प्रतिनिधी उपस्थित होत्या, त्यांनी या गटातर्फे तयार करण्यात आलेल्या द्रोणचे नमुने समक्ष सभेस दाखविले व द्रोण खरेदीबाबत विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा संस्थानतर्फे शिर्डी येथे दिनांक २३ मे,२००६ रोजी सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तेंव्हा या सोहळयासाठी द्रोण आवश्यक असल्याने, माढेश्वरी महिला बचत गटाकडून १ लाख द्रोण प्रती १००० नगास (शिर्डी पोहोच) रुपये १८०/- या दराने खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक-खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४. शिर्डी शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचे जलकुंभासाठी खुली जागा शिर्डी नगरपंचायतीस देणेबाबत.**

**निर्णय क्र.३०५. (अ)** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे पत्र जा.क्र. नपं/बांध/कावि-५/३२/२००६ दिनांक १५ एप्रिल, २००६ अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस शिर्डी शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचे जलकुंभासाठी खालीलप्रमाणे दोन ठिकाणी मागणी केलेली आहे. त्याचा तपशीलः

०१. सर्व्हे नंबर १०९/२, १०८/२ व १०७ मधील जागेत, नगरपंचायत पत्र क्रमांक कावि-११/१८/२००५ दिनांक १६ एप्रिल,२००५ अन्वये रेखांकनास मंजुरी दिलेली आहे. सदर रेखांकनात दोन ठिकाणी खुल्या जागा दर्शविण्यात आलेल्या आहेत. तुर्त वाहन विभागालगत असलेली मंजुर रेखांकनातील ३२६० चौरस मीटर एक खुली जागा (Open Space) उपलब्ध करुन मिळावी. सदरहु जागेत १२ आर क्षेत्रात झोन क्रमांक ०३ साठीच्या जलकुंभाच्या उभारणीसाठी उपयोगात आणता येईल.

०२. स.नं. १४८/२/१, १४८/२/२ व १४८/२/३ मधील जागेत पत्र क्रमांक न.पं./बांध/कावि/ ११/६०४/०५ दिनांक ३१ डिसेंबर,२००५ अन्वये रेखांकनास मंजुरी दिलेली आहे. सदर रेखांकनात नियोजित १८ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुस खुल्या जागा (Open Space) दर्शविलेल्या आहेत. १८ मीटर रुंद रस्त्याच्या पुर्व बाजुची जागा ही ३०२३.४४ चौरस मीटर इतकी आहे. सदरहु जागेत १२ आर क्षेत्रात झोन क्रमांक ०२ साठीच्या जलकुंभाच्या उभारणीसाठी उपयोगात आणता येईल.

उपरोक्तप्रमाणे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी वाढीव पाणी योजनेसाठी जलकुंभ उभारणेसाठी जागेची मागणी केलेली आहे.

**(ब)** शिर्डी नगरपंचायत यांना सर्व्हे नंबर १४८ मध्ये जलकुंभासाठी जागा देणे शक्य नाही. आरक्षण क्रमांक ३४ व ३९ मध्ये एका जलकुंभासाठी व भक्तनिवास ५०० खोल्या) परिसरात एका बाजूस, संस्थान आर्किटेक्टच्या सल्ल्याने, शिर्डी शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या दोन जलकुंभासाठी आवश्यक अशी जागा निश्‍चित करता येईल. शिर्डी नगरपंचायत यांचे मागणीप्रमाणे जागा हस्तांतरीत करणेसाठी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ कलम १७ (३) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, परिच्छेद "अ"मध्ये दर्शविलेप्रमाणे नगरपंचायतीने झोन क्र.०३ चे जलकुंभासाठी सर्व्हे नं.१०७ पैकी मधील सध्याचे वाहन विभागाचे लगतची खुली जागा मागणी केलेली आहे. परंतु या जागी संस्थानमार्फत साईभक्तांसाठी धर्मशाळा/निवासस्थाने आदि सुविधा उभारणे नियोजित आहे. यासाठी मंजूर रेखांकनात बदल करणे प्रस्तावित आहे. तसेच झोन क्र.०२ साठीचे जलकुंभासाठी सर्व्हे नं. १४८ पैकी मधील म्हणजेच सध्याचे धर्मशाळा विभागाजवळील बगीचाची खुली जागा मागणी केलेली आहे. परंतु याठिकाणी संस्थानमार्फत बगीचा पूर्णपणे विकसित केलेला असून, प्राप्त परिस्थितीत हा बगीचा साईभक्तांसाठी तसेच नागरीकांसाठी वापरात आहे. त्यामुळे मागणी केलेल्या उपरोक्त दोन्ही खुल्या जागांऐवजी झोन क्र.०३ साठीचे जलकुंभाकरिता सर्व्हे नं.१०७ पैकी मधील उत्तर-पूर्व कोपऱ्यात व झोन क्र.०२ साठीचे जलकुंभाकरिता सर्व्हे नं. १२६ पैकी मधील नांदुर्खी रस्त्यालगत (प्रस्तावित विकास योजनेतील १८ मीटर वळण रस्त्यालगत) प्रत्येकी १२ आर क्षेत्र शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचे जलकुंभ उभारणीसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यात यावे. याकामी महाराष्ट्र शासनाची पूर्व मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. श्रीसाईनाथ रुग्णालयातील रुग्णांचे सुविधेसाठी धर्मशाळा क्र.२ इमारतीला लिफ्ट बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३०६.** श्रीसाईनाथ रुग्णालय जुन्या इमारतीचे नुतनीकरणासह नविन इमारतीचे बांधकाम करणे प्रकल्प सुरु करतेवेळी श्रीसाईनाथ रुग्णालय दिनांक १२.०७.२००६ पासून धर्मशाळा क्र.०२ इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. आता रुग्णालयाचे नव्याने बांधकाम केलेल्या इमारतीत सुपर स्पेशालिटी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर नविन रुग्णालयाचे श्रीसाईबाबा हॉस्पिटल असे नामकरण करण्यात आलेले आहे. तसेच श्रीसाईनाथ रुग्णालय हे कायम स्वरुपी धर्मशाळा क्र.०२ इमारतीत ठेवण्यात यावे असे ठरले आहे.

धर्मशाळा इमातरीला रॅम्प अथवा लिफ्टची सोय नसल्यामुळे रुग्णांना तळमजल्यावरुन पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर नेण्यासाठी स्ट्रेचरचा वापर करता येत नाही. रुग्णांना झोळीच्या स्ट्रेचर मधुन वर नेण्यात येते. यामध्ये झोळीचे कापड फाटून अथवा झोळी हातातून निसटल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. त्याकरिता रुग्णांच्या सोयीसाठी धर्मशाळा क्र.०२ इमारतीत लिफ्टची व्यवस्था असणे आवश्यक असल्याचे वैद्यकीय अधिक्षीका यांनी दि.२३.१२.२००५ रोजीचे टिपणीद्वारे कळविलेले आहे.

धर्मशाळा क्र.०२ इमारतीला लिफ्टची व्यवस्था करणेसाठी इमारतीलगत पूर्व बाजूस लिफ्ट शॉफ्ट व मशिन रुमचे बांधकाम करावे लागेल त्यासाठी मे.निकम पाटील असोसिएटस्,श्रीरामपूर यांचेकडून एस्टिमेट तयार करुन घेण्यात आले असून त्यानुसार सदर बांधकामासाठी अंदाजे रु.३,१७,८८२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच लिफ्ट बसविणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रुपये ७,३०,०००/- मात्र इतका खर्च येईल. अशाप्रकारे सिव्हील वर्क व लिफ्ट बसविणेचे कामासाठी अंदाजे एकूण रुपये १०,४७,८८२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर अपेक्षित खर्चास तसेच सिव्हील वर्क व लिफ्ट खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबता प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

तसेच सदरहू प्रस्तावावरील चर्चेमध्ये श्रीसाईबाबा हॉस्पिटल इमारत कॅथलॅबमधील लॅमिनेटेड क्लॅडींग करणे, लॅमिनेटेड फ्लश डोअर्स बसविणे, कर्टन पाईप, डोअर क्लोजर्स बसविणे इत्यादि आवश्यक कामे सदर इमारतीचे वाढीव बांधकाम करीत असलेले ठेकेदार मे.नितीन बी.औताडे यांचेकडून करुन घेण्यात यावीत, असे ठरलें. याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

वरील निर्णय क्र.२५९ ते ३०६ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाऊसाहेब रा.वाकचौरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) |